## नासा येवतीकर

# हिंदू सण



# हिंदू सणं

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# हिंदू सण

ना सा येवतीकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# हिंदू सण

लेखक
नागोराव सा. येवतीकर
http://nasayeotikar.blogspot.com
फ़ोन – 9423625769
पत्ता : नागोराव सा. येवतीकर
मु. येवती पोस्ट येताळा
ता. धर्माबाद जि. नांदेड
ईमेल - nagorao26@gmail.com

चित्रकार : विनायक काकुळते, सिन्नर

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

400604


प्रकाशन ५ जून २०२०(वटपोर्णिमा)




©esahity Pratishthan®2020


- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .














http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/shala_ani_shikshak_nasa_yeotikar.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/jagruti_nasa_yewtikar.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mi_ek_shikshk_nasa_yeotikar.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/haravlele_dole_nasa_yewtikar.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sanvedana_nagorao_yewtikar.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/saripat_nasa_yeotikar.pdf

# ना सा येवतीकर



शिक्षकी पेशाकडे काही शिक्षक उपजीविका म्हणून पहातात तर काही जीविका म्हणून पहातात. शिकवणं हाच त्यांच्या जीवनाचा मूलाधार असतो. नासा सर या दुसऱ्या प्रकारचे शिक्षक आहेत. हाडाचे. त्यांच्या रक्तात लाल, पांढऱ्या पेशींबरोबरच खडू आणि फ़ळयाच्या काळया पांढऱ्या पेशीसुद्धा सापडतील असे अस्सल शिक्षक.

व्यवसायाने ते प्राथमिक शिक्षक (जिल्हा परिषद प्राथमिक कन्याशाळा, धर्माबाद, ता. धर्माबाद, जि. नांदेड) आहेत.

शालेय जीवनापासुनच लिखाण करण्याची फारच आवड त्यामुळे विविध वर्तमानपत्र, दैनिक, साप्ताहिक, मासिकात वैचारिक लेख लिहिण्याचा त्यांना छंद आहे. जीवन-शिक्षण या शैक्षणिक मासिकातून सुध्दा यापूर्वी लेख प्रकाशित झाले आहेत. दैनिक लोकपत्रमध्ये दर सोमवारी ऑफ पिरियड सदराखाली एक वर्ष स्तंभलेखन केले आहेत, ज्यात शैक्षणिक विषयी विचार मांडले होते. ते लहान मुलांसाठी सुध्दा छोटेखानी लेख लिहितात तसेच त्याना मनोरंजनातून शब्दसंपत्ती वाढवी यांसाठी विविध मनोरंजक शब्दकोडे तयार करतात. ते दैनिक देशोन्नतीच्या फनक्लब पेजवर प्रकाशित झाले आहेत. यापूर्वी याच ई साहित्यने संवेदना, मी एक शिक्षक, जागृती, शाळा आणि शिक्षक ही वैचारिक लेख असलेली ई पुस्तके आणि हरवलेले डोळे हा ई कथासंग्रह प्रकाशित करण्यात आले आहे. त्यांणा वाचकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांना सतत कामात व्यस्त ठेवण्यासाठी विविध उपक्रम तयार करतात आणि त्यां उपक्रमाच्या माध्यमातून शिकविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. नासा सरांचे अजून एक वैशिष्ट्य आहे. लोकांना लिहिते करण्याचा ते सदैव प्रयत्न करत असतात. त्यासाठी ते अद्ययावत साधनांचाही वापर करतात.

नासांचे सातवे पुस्तक “हिंदू सण” प्रसिद्ध करताना आम्हाला अभिमान वाटतो. या लेखसंग्रहातील अनेक लेख नवीन विद्यार्थ्यांना संदर्भ म्हणून उपयोगी पडतील.

कृपया आपली मते नासा सरांना कळवा. त्यांचा संपर्क क्रमांक 9423625769 असून nagorao26@gmail.com हा त्यांचा मेल पत्ता आहे.

नासा हे सातत्यपूर्ण लेखक आहेत आणि आपले लेखन त नियमित रित्या ब्लॉगवर प्रसिद्ध करत असतात. त्यांचा http://nasayeotikar.blogspot.com हा ब्लॉग तुम्हाला नक्की आवडेल.

त्यांच्या संपर्कात रहा. तुमचे विचार त्यांच्यापर्यंत पोहोचवा. नासांच्या तळमळीने चाललेल्या नवभारतनिर्माणात आपण सामिल व्हा.

आम्ही तर आहोतच.

सुनील सामंत

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

मनोगत

हिंदू सण

हिंदुस्थान हे भारताचे दुसरे नाव आहे. कारण या देशात हिंदू धर्माचे बहुसंख्य लोक वास्तव करतात. अनेक वर्षापासून हिंदू धर्मात विविध सण आणि उत्सव पारंपरिक पद्धतीने साजरी केली जातात. हिंदू नववर्षाची सुरुवात चैत्र महिन्यातील गुढीपाडवा या सणाने होते तर फाल्गुन महिन्यातील होळी या सणाने वर्षातील सणांचा समारोप होतो. हिंदू धर्मात साजरे होत असलेल्या विविध सणांचा आढावा घेतांना त्यात मला आलेले काही अनुभव मांडण्याचा प्रयत्न केला आहे. लहानपणीच्या अध्यात्मिक संस्कारामुळे आणि स्व. पांडुरंगशास्त्री आठवले उर्फ दादाजी यांच्या स्वाध्याय कार्यामुळे मी खरा प्रेरित झालो. प्रचलित आख्यायिका किंवा जुन्या काळातील गोष्टीसाठी इंटरनेटवरील माहितीचा आधार घेण्यात आला आहे. काही महत्वपूर्ण सण या पुस्तकात समाविष्ट केले आहेत. मला आशा आहे की, आपणांस हे पुस्तक नक्कीच आवडेल आणि वाचक वर्ग याचे स्वागत करतील. यातील काही माहिती ऐकलेली, वाचलेली आणि इंटरनेटच्या माध्यमातून संकलित केले आहे. एस. जी. पब्लिक स्कुल सिन्नर नाशिक येथील शिक्षक मित्र विनायक काकुळते यांच्या माझी शाळा माझा फळा या उपक्रमात रंगविण्यात आलेले विविध सणांचे फोटो वापरण्याची परवानगी दिली त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. तसेच या पुस्तकाला सेवानिवृत्त मुख्याध्यापक आणि साहित्यिक नागेश सु पांडे शेवाळकर यांनी प्रस्तावना देऊन मला प्रेरित केले आहे, त्याबद्दल त्यांचे ही आभार. या पुस्तकातील माहिती आपणास आवडल्यास ते आपल्या मित्रांना शेअर करण्यास विसरू नये.

नासा येवतीकर

विषय शिक्षक तथा स्तंभलेखक

मु. येवती ता. धर्माबाद, 9423625769

अर्पणपत्रिका

स्वाध्याय चळवळीचे प्रणेते

परमपूज्य स्व. पांडुरंगशास्त्री आठवले उर्फ दादाजी

यांना समर्पण.

# प्रस्तावना

*हिंदू सण : उपयुक्त माहितीचा संग्रह!*

'नासा' या नावाने शैक्षणिक आणि साहित्यिक क्षेत्रात सर्वदूर परिचित आणि प्रसिद्ध असलेले नागोराव येवतीकर यांचे एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि तितकेच माहितीपूर्ण असलेले 'हिंदू सण' या शीर्षकाचे पुस्तक वाचक दरबारी सादर होत आहे. सुनील सामंत ई साहित्य प्रतिष्ठान यांनी हा संग्रह प्रकाशित केला आहे. यापूर्वी येवतीकर यांची एकूण सात संग्रह प्रकाशित झाले आहेत. यापैकी 'पाऊलवाट' हा त्यांचा पुस्तक रुपाने प्रकाशित संग्रह आहे. 'मी एक शिक्षक, जागृती, शाळा आणि शिक्षक, संवेदना, हरवलेले डोळे आणि सारीपाट हे ई संग्रह (ऑनलाईन) प्रकाशित झाले आहेत. यावरुन ऑनलाईन साहित्यावर येवतीकरांचे प्रभुत्व समजून येते.

हिंदू सण या लेखमालेत त्यांचे एकूण पौर्णिमा-अमावस्या आणि सण, गुढीपाडवा, श्रीराम नवमी, हनुमान जयंती, अक्षय तृतीया, गुरुपौर्णिमा, नागपंचमी, रक्षाबंधन, पोळा, श्री गणेश चतुर्थी, दसरा, दिवाळी, गीता जयंती, मकरसंक्रांत, होळी आणि धुलिवंदन असे एकूण एकोणवीस लेख वाचायला मिळतात. प्रत्येक सणाची माहिती, तो सण साजरा करण्याची पद्धती, त्या सणाचे महत्त्व, तो सण कसा साजरा करावा ? अशी अत्यंत उपयुक्त माहिती येवतीकरांनी लिहून एक फार मोठे सामाजिक कार्य केले आहे. आपण सारे जण नेहमीच पारंपरिक पद्धतीने सण साजरे करतो. परंतु अनेकांना त्या सणामागची सामाजिक भूमिका माहिती नसते. ते या पुस्तकात येवतीकरांनी अतिशय साध्या, सोप्या भाषेत सांगितले आहे. येवतीकरांनी यातील अनेक लेख त्या त्या सणाचे औचित्य साधून त्याच सणाच्या दिवशी महाराष्ट्रातील अनेक वर्तमानपत्रातून प्रकाशित केले आहेत. लेख लिहित असताना ते केवळ माहितीने ओतप्रोत झाले तर ते वाचकांना कंटाळवाणे होऊ नये ही काळजी लेखकाने घेतली

आहे. 'अंजनीसुत पवनपुत्र हनुमान' या लेखात त्यांनी मारोतीरायाची भक्तीमय परंपरा लिहिताना लग्नसोहळ्याच्या समयी हनुमंताचे दर्शन आणि महारुद्र मारोतीच्या मंदिराचे महत्त्व वेगळ्या शब्दात वर्णन केले आहे. मारोतीरायाच्या साक्षीने निघणारी नवरदेवाची वरात आणि प्रसंगी रुसलेला नवरदेव ही जुनी परंपराही लेखकाने वर्णन केली आहे. नवरदेवाचे रुसणे हा प्रकार आज होत नसला तरीही पूर्वी नवरदेवाचे साध्या साध्या गोष्टींसाठी रुसणे आणि ती मागणी पूर्ण होईपर्यंत सीमांत पूजनाला किंवा लग्नासाठी बोहल्यावर चढण्यासाठी होणारा उशीर, त्याचबरोबर नवरदेवाचा रुसवा काढण्यासाठी करावी लागणारी मनधरणी हे सारे यानिमित्ताने आठवले. त्याचबरोबरीने भीम आणि मारोती यांच्यामधील 'शेपटी' युद्धाचेही वर्णन केले आहे. ज्यामुळे भीमाला आपल्या शक्तीबाबतचे गर्वहरण होते.

आज लयाला जाऊ पाहणाऱ्या 'छडी लागे छमछम, विद्या येई घमघम' या परिस्थितीमुळे दीन झालेला शिक्षक हे वर्णन लेखकाने 'माझे गुरु : एक आठवण' या लेखात समाविष्ट केले आहे. गुरुप्रती लेखकाची असलेली श्रद्धा, निष्ठा या लेखातून ठायीठायी व्यक्त होते. येवतीकरांनी साहित्य क्षेत्रात जे यश संपादन केले आहे त्यामागे शाळेतील शिक्षकांची प्रेरणा असल्याचे ते भक्तीयुक्त अंतःकरणाने लिहितात. कारण शालेय जीवनात लेखक जेव्हा जेव्हा एखादा लेख लिहायचे त्यावेळी त्यांचे शिक्षक लेखकाला शाबासकी द्यायचे, कौतुक करायचे. हा लेख म्हणजे येवतीकरांनी त्यांच्या गुरुंना केलेले वंदनच आहे.

हिंदू सण हे पुस्तक अत्यंत माहितीपूर्ण असा दस्तावेज असून तो प्रत्येक वाचकाने आवर्जून वाचण्यासारखा आहे. येवतीकर यांनी प्रत्येक सणाचा भरपूर अभ्यास करून, माहिती जमवून हा लेखसंग्रह वाचकांसाठी आणला आहे. त्याचे स्वागत करताना मनस्वी आनंद होतो आहे. ना. सा. येवतीकर यांच्या आगामी लेखनास अनंत शुभेच्छा! धन्यवाद!

नागेश सू. शेवाळकर, पुणे संपर्क ९४२३१३९०७१

**अनुक्रमणिका**


01) पौर्णिमा - अमावस्या आणि सण

02) गुढीपाडवा

03) श्रीरामनावमी

04) हनुमान जयंती

05) अक्षय तृतीया

06) वटपौर्णिमा

07) पंढरीची वारी - आषाढी एकादशी

08) गुरुपौर्णिमा

09) नागपंचमी

10) रक्षाबंधन

11)  बैलांचा सण पोळा

12).गणेश चतुर्थी

13) दसरा

14) कोजागिरी पौर्णिमा

15) दिवाळी

16) गीता जयंती

17) मकरसंक्रांत

18) होळी

19) धुलीवंदन

## 01) पौर्णिमा - अमावस्या आणि सण

मराठी महिने एकूण बारा आहेत. प्रत्येक महिना तीस दिवसांचा असून शुक्ल पक्ष आणि कृष्ण पक्ष असे दोन पक्ष आहेत. दर पंधरा दिवसांनी पौर्णिमा आणि अमावस्या तिथी येत असते. प्रत्येक महिन्यातील पौर्णिमा कोणत्या ना कोणत्या सणाने प्रसिद्ध आहे. मराठी महिन्याची सुरुवात चैत्र पक्षाने होते आणि या महिन्यातील पौर्णिमेला हनुमान जयंती असते. हिंदू धर्मातील लोकं भल्या पहाटे सूर्य उगवण्याच्या अगोदर मारोती म्हणजे हनुमानाची यथोचित पूजा करतात. प्रत्येक गावात हनुमानाचे मंदीर असतेच असते. या दिवशी गावोगावी भंडाऱ्याचे आयोजन करून महाप्रसाद वाटप केला जातो.

स्त्रियांचा वटपौर्णिमा सण जेष्ठ महिन्यात येतो. आपल्या पतीला दीर्घायुष्य मिळावे म्हणून या दिवशी सुवासिनी स्त्रिया वडाच्या झाडाला फेऱ्या मारतात.

आषाढ महिन्यातील पौर्णिमेला गुरू पौर्णिमा असे म्हटले जाते. महर्षी व्यास यांच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. शिष्यांनी गुरूला वंदन करून आशीर्वाद घेत असतात. श्रावण महिन्यातील पौर्णिमेला रक्षाबंधन हा सण येतो. या दिवशी बहीण आपल्या भावाला राखी बांधून औक्षण करते. बदल्यात भाऊ तिला काही भेटवस्तू देतो आणि आयुष्यभर रक्षण करण्याचे वचन देखील. तसेच यास नारळी पौर्णिमा असे ही म्हटले जाते. कोळी समाजातील लोकं यादिवशी समुद्राला नारळ अर्पण करतात. रात्रीला जागरण करून चंद्र दुधात पहायचे आणि त्याचे प्राशन करण्याचा कोजागिरी पौर्णिमा आश्विन महिन्यात येतो. कार्तिक महिन्याचा पौर्णिमेला गुरू नानक जयंती येत असते. शीख धर्माचे संस्थापक गुरूनानक होय. या दिवशी गुरुद्वारा मध्ये त्यांच्या धर्मग्रंथाचे पठन केले जाते. श्री दत्तात्रयाची जयंती मार्गशीर्ष महिन्यातील पौर्णिमेला साजरी केली जाते. माहूर गडावर असलेल्या दत्तात्रय मंदिरात खूप मोठी यात्रा भरविली जाते. माहूर गडावर या दिवशी मुंगयाच्या रांगेसारखे भक्तांची रांग दिसून येते. पौष

महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेला शाकंभरी पौर्णिमा म्हटले जाते. तिला हजारो डोळे होते म्हणून शाकंभरी असे नाव पडले. दुर्गा मातेचे ते रूप आहे. मराठी वर्षातील शेवटचा महिना म्हणजे फाल्गुन, या महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेला हुताशनी पौर्णिमा म्हणतात आणि होळीचा सण साजरा करतात. गावोगावी लाकडाची होळी तयार करून पेटविली जाते तर काही ठिकाणी रावणाचा पुतळा तयार करून त्याला जाळले जाते. त्याच्या दुसऱ्या दिवशी रंगपंचमी असते त्यास धूळवंड असे ही म्हणतात.

पौर्णिमेप्रमाणे काही महिन्यात अमावस्येला सण येतात जसे की, श्रावण महिन्यातील अमावस्येला पिठोरी अमावस्या म्हणतात आणि या दिवशी बैलांचा पोळा सण साजरा करतात. शेतकरी लोकांसाठी हा एक महत्वपूर्ण सण आहे. भाद्रपद महिन्यातील अमावस्येला सर्वपित्री अमावस्या म्हणतात. आपल्या पूर्वजांना आठवण करून त्यांच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून पित्राचे जेवण करतात.  दिवाळी सणाच्या अगोदर आश्विन अमावस्येला लक्ष्मीपूजन हा सण उत्साहात साजरा केला जातो. व्यापारी लोकांसाठी हा महत्वाचा सण समजले जाते. दुसऱ्या दिवशी पाडवा म्हणजे दिवाळी असते. पौष महिन्यातील अमावस्येला मौनी अमावस्या ( जैन) म्हणतात. या दिवशी संपूर्ण दिवसभर मौन धारण करणे गरजेचे असते. काही वेळा मौन राहणे खूप महत्वाचे आहे याची शिकवण या सणामुळे मिळते.

अशा रीतीने मराठी महिन्यातील प्रत्येक पौर्णिमा आणि अमावस्या कोणत्या ना कोणत्या सणाने साजरी केली जाते.

02) सण - गुढीपाडवा




विकारी विचारांवर विजयाचा दिवस

चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे हिंदू पंचांगातील मराठी महिन्यातील नववर्षाचा पहिला दिवस. हा दिवस सर्वत्र गुढीपाडवा म्हणून साजरा केला जातो. साडेतीन मुहुर्तापैकी हा एक शुभ मुहूर्त म्हणून समजल्या जाते. आजच्या दिवशी सोने, घर, फ्लॅट, वाहन इत्यादी नवीन वस्तू खरेदी करण्याचा प्रघात आहे. आजच्या मुहूर्तावर अनेक जण आपल्या नव्या व्यवसायाचा शुभारंभ देखील करतात. या मुहूर्तावर चालू केलेल्या व्यवसायात, भागीदारीत किंवा गुंतवणुकीत चांगली भरभराटी मिळते असा आजपर्यंतचा अनुभव आहे. शालिवाहन शकाची सुरुवात याच दिवसापासून झाली. याबाबतीत एक आख्यायिका सांगितली जाते ती अशी की, शालिवाहन

नावाच्या एका कुंभाराच्या मुलांने मातीचे सैन्य तयार केले, त्यावर मंतरलेले पाणी शिंपडून त्यांना सजीव केले. त्यांच्या मदतीने त्याने प्रभावी शत्रूचा पराभव केला. या विजयश्रीपासून शालिवाहन शकाची सुरुवात झाली. वास्तविक पहाता ही कथा लाक्षणिक अर्थाने सांगितले जाते. शालिवाहन राजाच्या काळातील लोक हे पूर्णतः पौरुषहीन व पराक्रमहीन बनले होते, आळशी बनले होते, शत्रूचा हल्ला परतवून लावू शकत नव्हते, त्यांना हरवु शकत नव्हते. परंतु शालिवाहन राजाने त्या चेतनाहीन, पौरुषहीन,पराक्रमहीन व आळशी अर्थातच दगड व मातीचा बनलेल्या लोकांत चैतन्य प्रकट केले. त्यांच्यात आत्मविश्वास व पराक्रमीपणा जागृत केले आणि शत्रूला पराभूत केले. तेव्हापासून शालिवाहन शक गणना करण्यास प्रारंभ करण्यात आली ते म्हणजे आजचा दिवस होय.

आज सुद्धा आपल्या लोकांची अवस्था शालिवाहनच्या राज्यासारखीच आहे. देशात आज बेरोजगार युवकांची संख्या भरमसाठ वाढलेली आहे. त्यामानाने त्यांच्या हाताला काम नसल्यामुळे त्यांचे पाय वाममार्गाकडे वळून तो व्यसनाच्या आहारी जात आहे. त्यांच्या हातून देशाची उभारणी होण्याऐवजी देश रसातळाला जात आहे. युवकांमध्ये नवीन जग निर्माण करण्याची शक्ती आहे याची जाणीव करून द्यायला पाहिजे, त्यांचा आत्मविश्वास व पौरुषत्व जागी केल्यास प्रगतशील भारताचे चित्र नक्कीच पाहायला मिळेल. बजरंगबलीच्या अंगात सात समुद्र पार करण्याची शक्ती होती. परंतु त्यांच्यात आत्मविश्वास नव्हता म्हणून सागराकडे तोंड करून निराश होऊन बसला होता. परंतु जांबुवंतांनी त्या बजरंगबलीच्या शक्तीवर विश्वास होता म्हणून त्यांनी त्यांच्यातील आत्मविश्वास जागे केल्यानंतर पुढे बजरंगबलीने सातासमुद्रापार जाऊन सीतेचा शोध तर घेतलाच शिवाय संपूर्ण लंकेला आग लावून परत सुद्धा आला. कुरुक्षेत्रावर कौरव आणि पांडव यांच्यामध्ये युद्ध प्रारंभ होण्याच्या काही क्षणापूर्वी युद्धाचा त्याग करणाऱ्या अर्जुनाला भगवान श्रीकृष्णाने गीतेद्वारे मार्गदर्शन केले. अर्जुनाच्या आतील आत्मविश्वास, पौरुषत्व, पराक्रमीपणा जागा झाला आणि त्यांच्या हातून अधर्माचा नाश झाला. तसा चैतन्य आत्मविश्वास आज प्रत्येकात जागे करायचे आहे. प्रत्येकाच्या आत एक सुप्तशक्ती

लपलेली असते, ते जागे करायचे आहे. त्यासाठी कधी शालिवाहन, कधी जांबूवंत तर कधी श्रीकृष्णाची भूमिका प्रत्येकाने करणे गरजेचे आहे.

या गुढीपाडव्याच्या संदर्भात रामायणातील एक कथा सांगितली जाते, दक्षिणेकडील प्रजेला वाली नावाचा वानर त्रास द्यायचा. त्याचा बंधू अंगद, त्यांना सुद्धा त्याचा त्रास होत होता. त्याच्या त्रासाला संपूर्ण जनता कंटाळली होती. सीतेच्या शोधार्थ रवाना झालेले भगवान श्रीराम तेथे गेले. त्यांने भगवान श्रीरामाला विनंती केली की, त्या दुष्ट वाली वानराचा बंदोबस्त करावा. तेव्हा भगवान श्रीरामाने जुलमी व असुरी वाली वानराचा पराभव केला. त्या विजयाप्रीत्यर्थ तेथील लोकांनी घरोघरी गुढी उभारून हा आनंदोत्सव साजरा केला, असे सांगितले जाते. तेव्हापासून आजही घरोघरी जी गुढी उभारली जाते ते विजयाचा संदेश देते. आपल्या घरातून, दारातून, तनामनातून आसुरी संपत्तीचा व विचारांचा नाश करून भोगावर योगाचा, वैभवावर विभूतीचा आणि विकारावर विचारांचा विजय मिळविणे म्हणजेच खऱ्या अर्थाने गुढी उभारल्यासारखे होईल.

आजच्या दिवसाचे शेतकऱ्यांच्या जीवनात देखील अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. आजपासून शेतकरी आपल्या नव्या शेती व्यवसायाला प्रारंभ करीत असतो. गतवर्षी झालेल्या जमा-खर्चाचा आढावा घेऊन पुढील वर्षाचे नियोजन करतो. यावर्षी कोणकोणती पिके घ्यायची ? खरिपात कोणती व रबीमध्ये कोणते पिकं घ्यायची ? सालगडी ठेवणे, शेती बटाव, तिजई किंवा खंडच्या हिशेबाने देणे या बाबींचा व्यवहार करणे, डोक्यावर असलेले कर्ज देणे, नवीन कर्ज घेणे इत्यादी साऱ्या बाबी आजच्या दिवशी पूर्ण केल्या जातात. अर्थात आजच्या दिवशीच शेतकरी पुन्हा एकदा नव्या जोमाने, उत्साहाने आणि उमेदीने कामाला लागतो. दरवर्षी तो आपल्या नशिबासोबत जुगार खेळत असतो. निराश किंवा हताश न होता पुन्हा एकदा आजच्या दिवशी शेतातून जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्याचा संकल्प करतो. शेतकरी आपल्या घरी गुढी उभारून त्याला साखरेचे व खोबऱ्याचे गाठी टाकतात. ज्याप्रकारे शाळेत

झेंडावंदनाच्या दिवशी सकाळी ध्वज फडकाविला जातो आणि सायंकाळी सूर्य मावळताना ध्वज उतरवून घेतल्या जाते, अगदी त्याच पद्धतीने या दिवशी घरोघरी प्रत्येकजण आपल्या दारासमोर, अंगणात किंवा घरावर सकाळी गुढी उभारतात व सायंकाळी सूर्य मावळतीला काढून ठेवतात.

मराठवाड्यातील सीमावर्ती भागात आजच्या दिवशी नवीन आंबा, नवीन चिंच, नवीन खोबरा आणि कडुनिंबाचे फुल याचे मिश्रण तयार करून त्याचे रसपान तयार करतात. त्यास या भागात " पचडा "असे म्हटले जाते. त्याच्या सेवनाने मनुष्यास शारीरिक, मानसिक व बौद्धिक आरोग्य लाभते असे पूर्वज सांगतात. लिंबू कडू आहे पण त्याच्या सेवनाने आपण निरोगी राहतो. यातून लाक्षणिक अर्थ एक असाही निघतो की, कित्येक विचार आचरणात आणताना प्रथमतः खूप कष्ट सोसावे लागतात, एवढेच नाही तर नकोसे म्हणजे कटू सुद्धा वाटतात. परंतु तेच विचार आपले जीवन सुंदर बनवितात. याचाच अर्थ जीवनात प्रगतीपथावर जायचे असेल तर काहीवेळा कडू घोट प्यावे लागतात याची सूचना त्यानिमित्ताने मिळते सर्व ते हसत मुखाने स्वीकार करण्यात खरे जीवन आहे. गुढीपाडव्याच्या निमित्ताने सर्व वाचकांना हार्दीक शुभेच्छा.

03) सण - श्रीरामनवमी

रघुपती राघव राजाराम

भगवान श्रीराम हे भारतीय संस्कृतीचे व जनतेचे अधिष्ठान आहेत. पुन्हा पुन्हा ऐकू येणारी श्रीराम जय राम जय जय रामचा उदघोष याची साक्ष आहे. भारतातील ग्रामीण भागात आजही दोन व्यक्ती समोरासमोर आले की परस्परांना दोन्ही हात जोडून " रामराम " म्हणतात. यातून एक अर्थ असाही निघतो की, प्रत्येक व्यक्तीत राम वसलेला आहे. कोणत्याही सुव्यवस्थित व संपन्न राज्यव्यवस्थेसाठी रामराज्य हा शब्द पर्याय म्हणून वापरला जातो. कारण त्यांचे राज्यच होते तसे आदर्श. एखाद्या व्याधी, समस्येवर किंवा संकटावर शेवटचा उपचार म्हणजे रामबाण उपाय होय. कारण त्यांचा प्रत्येक कर्म हा जीवनातील प्रत्येक समस्येवर शेवटचा उपाय आहे. भगवान श्रीरामाचे प्रेमशासन भारतीयांच्या हृदयावर आजतागायत चालू आहे.

मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्रीरामाचा जन्म चैत्र शुद्ध नवमीला दुपारी बारा वाजता रखरखत्या उन्हात झाला. जेंव्हा जग आणि जीव आधि, व्याधि आणि उपाधी यात तप्त होत होते तेव्हा जगाला सुख, शांती देण्यासाठी प्रेम, पावित्र्य व प्रसन्नतेचा हा पुंज जन्म घेतला. त्यांचा जन्माने संपूर्ण जगाला जीवन जगण्याचा आदर्श मार्ग लाभलेला आहे. श्रीरामाच्या संपूर्ण चरित्राचा अभ्यास करून एक-एक गुण आत्मसात करण्याचा प्रयत्न केल्यास रामो भुत्वा राम यजेत अर्थात राम होऊन रामाची पूजा करणे असा उजाडेल यात शंका नाही. कौटुंबिक, सामाजिक, नैतिक तसेच राजकीय या सर्वच क्षेत्रात वावरताना आपली मर्यादा कोणती ? हे कळण्यासाठी भगवान श्रीराम चरित्रांचा अभ्यास करावा. श्रीरामांनी आपल्या विचारात, विकासात किंवा व्यवहारात सर्वच कार्यात कधीही मर्यादा ओलांडली नाही म्हणूनच त्यांना

मर्यादा पुरुषोत्तम असे म्हटले जाते. आजच्या श्रीरामनवमीच्या दिवशी त्यांच्या गुणांचा परामर्श घेऊन त्याचा स्वीकार केल्यास खऱ्या अर्थाने नवमी साजरी केल्यासारखे होईल.

भगवान श्रीरामांनी आपल्या समोर एक कौटुंबिक आदर्श ठेवले आहे. रामाला दुसरे तीन बांध होते. परंतु त्यांच्यात कधीही कलह किंवा वाद झाला असे आपण कधी ऐकलेले नाही. त्यागात पुढे व भोगात मागे असा त्यांचा जीवन मंत्र होता. येथे नेहमी दुसऱ्यांचा विचार करण्यात येतो, त्यागाची तयारी ठेवण्यात येते, तेथे क्लेश, भांडण, झगडा, कलह, वाद  हे सर्व शेकडो कोस दूर रहातात. आज आपणाला या विचारांची नितांत आवश्यकता आहे. पिता राजा दशरथाने वनात जाण्याची आज्ञा दिल्यावर ते थोडेदेखील दुःखी झाले नाही वडिलांची आज्ञा पाळणे हे मुलांचे परमकर्तव्य आहे त्यासाठी वाट्टेल ते कष्ट सोसणारा पुत्रच आदर्श बनू शकतो.

वृद्ध माता पित्याला सहारा देण्यात यावे असा कायदा सरकारला तयार करावा लागतो. यात आपली फार मोठी नामुष्की आहे. जिच्या वचनामुळे श्रीराम यांना वनवास भोगावा त्या कैकयी मातेवर त्यांनी कधीच राग धरला नाही. आईला समजून घेणारे पुत्र बनणे म्हणजेच तिने आपणाला जन्म देताना घेतलेल्या त्रासाची परत केलेली पावती नव्हे काय ? श्रीरामाचे तीन ही आईवर सारखेच प्रेम होते. रावणाच्या तावडीतून सीतेला सोडवून आणल्यानंतर अयोध्या नगरीतील लोकांची कुजबुज लक्षात घेऊन श्रीरामाने आपली पत्नी सीतेचा त्याग करावा लागला. यामागे राज्यातील लोकांचा विश्वास संपादन करणे हे राजाचे पहिले कर्तव्य आहे. त्यामुळे श्रीरामाने सीतेचा त्याग केला. त्यांच्या हृदयात फक्त एकच स्त्रीसाठी जागा होती ती म्हणजे सीता. एकपत्नी निष्ठ पती राहणे म्हणजेच त्याला सितापती म्हटले जाते. आज भारतात जो अनैतिक किंवा अत्याचार बोकाळला आहे त्यावर सितापती हा पर्याय सर्वोत्तम आहे, असे वाटते.

ऋषी विश्वामित्र हे श्रीरामाचे गुरू होते. विश्वामित्रांचे श्रीरामावर जेवढे प्रेम होते त्यापेक्षा जास्त श्रीरामाचे विश्वामित्रावर होते. आश्रमात एक हृदय दुसऱ्या हृदयाशी बोलत होते.

विश्वामित्रांनी श्रीरामांना धनुर्विद्येसोबत जीवन जगण्याचा आदर्श मार्ग सुद्धा नकळत शिकविले. श्रीरामाच्या गुरुभक्तीमुळे व गुरुवर असलेल्या अपार श्रद्धेमुळे त्यांना ऋषींनी जगातील सर्व ज्ञान दिले. गुरुविना जीवन नाही आणि गुरुवर श्रद्धा असल्याशिवाय काही प्राप्त होत नाही. याची जाणीव त्यांच्या चरित्राच्या अभ्यासावरून होते. किष्किंध्येच्या असुरी व जुलमी वाली वानराला मारून श्रीरामाने सुग्रीवाचे मन जिंकले आणि सुग्रीवाने लंकेतील सीतेला सोडविण्यात श्रीरामाला सर्वतोपरी मदत करून मैत्री कायम केली. एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ या म्हणीप्रमाणे त्यांचे कार्य होते. संकटात मदत केलेला मित्रच खरा मित्र म्हणून ओळखला जातो. रावण हा रामाचा शत्रू होता. त्यांच्या निधनानंतर बिभीषण अग्निसंस्कार करण्यास नकार देतो त्यावेळी स्वतः श्रीराम हे काम करण्यास पुढे येतात यातून त्यांचे शत्रूवर असलेले प्रेम ही कळते. किष्किंध व लंका राज्य जिंकून त्यांनी आपले साम्राज्य वाढविले नाही. याउलट ते दान करून तेथील लोकांचे मन जिंकले. दुसऱ्याची वस्तू घेण्याने त्याच्यात प्रेम तर राहणारच नाही उलट वितुष्ट निर्माण होते. भगवान श्रीरामाच्या अंगी असलेल्या मातृप्रेम, पितृप्रेम, बंधुप्रेम, शत्रूप्रेम, मित्रप्रेम, पत्नीप्रेम, राज्यप्रेम, जनप्रेम, आणि गुरूप्रेम या नऊ गुणांचा जीवन जगतांना आत्मसात करण्याचा प्रयत्न केल्यास पृथ्वीतलावर असलेले दुःख, क्लेश, तणाव नक्की नाहीशे होतील. राष्ट्रपिता महात्मा गांधी सुद्धा जनतेला रामाच्या जीवनाचे पालन करण्यास सांगितले होते. रघुपती राघव राजाराम, पतित पावन सीताराम ह्या त्यांच्या धूनमुळे संपूर्ण वातावरण मंगलमय होऊन जाते. श्रीरामनवमीच्या सर्वांना हार्दीक शुभेच्छा.

04) हनुमान जयंती

अंजनीसुत पवनपुत्र हनुमान

अंजनीच्या सुता तुला रामाचे वरदान एक मुखाने बोला बोला जय जय हनुमान या दादा कोंडके यांच्या चित्रपटातील गीताने आज सकाळ झाली. कारण ही तसंच होतं, आज हनुमान जयंती त्यानिमित्ताने सकाळी सकाळी हे गीत कानावर पडले. रामनवमी झाल्यानंतर जी पौर्णिमा येते त्यास हनुमान जयंती पौर्णिमा असे म्हटले जाते. तसं तर लहानपणापासून हनुमानाविषयी विशेष आकर्षण होतं. त्यांचा तो रुबाब, पिळदार शरीर आणि लहानपणापासून त्यांच्या शौर्यकथा ऐकून हनुमानासारखे आपण ही व्हावे म्हणून त्यांची नित्य प्रार्थना करीत असू. हनुमानाला तसे बजरंगबली, मारुती, पवनपुत्र, पवनसुत, वायुदूत असे अनेक नावांनी ओळखले जाते. जन्माल्याबरोबर सूर्याकडे झेप घेणारे अशी त्यांची ख्याती आख्यायिकामध्ये सांगितली जाते. गाव म्हटले की मारुतीचे मंदिर असतेच असते. सहसा मारुतीचे मंदीर गावाच्या बाहेर असते. त्याशिवाय गाव ही संकल्पना पूर्ण होत नाही. संत रामदास स्वामी यांनी त्यांच्या काळात गावोगावी हनुमान मंदिराची स्थापना केली. मारुतीरायाचे चरणस्पर्श केल्याशिवाय कोणत्याही नवरदेवाचे लग्न होत नाही. ते स्वतः ब्रह्मचारी होते मात्र लग्न करणारे नवरदेव मारुतीचे दर्शन करून बोहल्यावर चढतात. विनोदाने लोकं म्हणतात की, मारुती राया आजपासून मी माझे ब्रम्हचर्य पथ सोडत असून गृहस्थाश्रमात पदार्पण करीत आहे, तेंव्हा मला आपले आशीर्वाद द्यावे. आम्ही लहान असताना एक चित्र हमखास दिसायचे. नवरदेवाला मारुतीच्या समोर खुर्चीवर बसवून कपडे चढवीत असत आणि तेथून वाजत गाजत नवरदेवाची मिरवणूक निघत असे. बहुतांश वेळा याच मारुती रायासमोर रुसलेले नवरदेव पाहायला मिळत. रुसणं तरी कशासाठी सायकल, घड्याळ किंवा रेडिओ यासाठी तेंव्हा रुसणं असल्याचे. हे वाचून आजच्या मुलांना हसायला येतंय नक्की. मित्रपरिवाराला ही एक सुवर्णसंधी राहत असे नवरदेवच्या घोड्यासमोर नाचायची. मंडप दूर असेल तर नाचत-नाचत

जायला खूप वेळ लागत असे. मग सर्वांची एकच घाई होत असे. लवकर चला, लवकर चला म्हणत कोणीतरी सर्वाना ढकलत मंडपात नेत असत. आज ती प्रथा पूर्णपणे बंद झाली नसली तरी त्यात खूप काही बदल झाले आहे. मारुती हे श्रीरामाचे परमभक्त. श्रीरामाशिवाय त्यांना कशाचीही गोडी नव्हती. म्हणूनच जेथे जेथे श्रीराम दिसतात तेथे तेथे हनुमान दिसतातच. कुस्ती खेळणारे मल्ल म्हणजे पहिलवानांची तर मारुतीराया परम दैवत होय. त्यांच्या चरणाला स्पर्श करून ते कुस्तीच्या खेळाला सुरुवात करतात. तसे तर हनुमान खूपच शक्तिशाली पण त्याला कधी ही आपल्या शक्तीचा गर्व नव्हता. गदाधारी भीम हा तसाच एक शक्तिशाली, त्याला आपल्या शक्तीचा गर्व आला होता, त्यांचे गर्वहरण करावे म्हणून हनुमानाने एका वृद्धाचे रूप घेऊन आपले शेपूट त्याच्या जाण्या-येण्याच्या रस्त्यावर टाकून ठेवले. भीमाला खूप राग आले. त्याने शेपूट हटविण्याची विनंती केली. मारुतीने आपण वृद्ध असल्यामुळे तुम्हीच शेपूट उचलून बाजूला करावं असे म्हटले. तेंव्हा भीम खाली वाकून मारुतीची शेपटी बाजूला करण्याचा प्रयत्न करू लागले पण शेपटी जागचे काही हलेना. खूप प्रयत्न करून देखील शेपूट हलत नाही हे पाहून भीमाला आपली चूक लक्षात आली आणि मारुतीरायाच्या त्यांनी पाया पडले. अश्या पद्धतीने मारुतीने भीमाचा आपल्या शक्तीवरील अहंकार दूर केले. दर शनिवारी हनुमान भक्त त्यांच्या दर्शनाला जातात. काही जण यादिवशी उपवास देखील करतात. हनुमान जयंतीच्या दिवशी गावोगावी महाप्रसादाचे देखील आयोजन केले जाते.

मनोजवं मारुततुल्य वेगं ।
जिंतेंद्रियं बुद्धीमतां वरीष्ठम ।।
वातात्मजं मारुततुल्यवेगं ।
श्रीराम दूतं शरणं प्रपद्ये ।।

ह्या श्लोकाची दररोज मनन किंवा पठण करणे म्हणजेच मारुतीरायाची उपासना करणे होय.

05) सण - अक्षय तृतीया

अक्षय तृतीया : शुभ मुहूर्त

हिंदू संस्कृतीत मुहूर्ताला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. कोणतेही शुभ कार्य करायचे म्हणजे त्यासाठी चांगला मुहूर्त असावा लागतो. चांगल्या मुहूर्तावर सुरू केलेल्या कार्यात हमखास यश मिळणारच असा विश्वास असतो. वैशाख महिन्यातील शुध्द तृतीयेला येणाऱ्या अक्षय तृतीया हा साडेतीन मुहूर्तापैकी एक शुभ मुहूर्त म्हणून समजल्या जाते. संपूर्ण दिवसभर हा दिवस चांगल्या समजल्या जातो. त्यामुळे अक्षय्य तृतीयेला व्यापारीवर्गात व समाजात अनेक विशेष करून शेतकरी वर्गात महत्त्व आहे. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी गुंजभर तरी सोने खरेदी करण्याची फार पूर्वीपासूनची परंपरा आजतागायत चालू आहे. या दिवशी खरेदी केलेल्या सोन्याने घरात लक्ष्मीचा वास होतो आणि वर्षभर संपत्तीत वृद्धी होते अशी श्रद्धा आहे. त्यामुळे राज्यात या दिवशी अनेक लोकाकडून सोने खरेदी केल्या जाते. व्यापाराच्या दृष्टीने हा दिवस शुभ मानला जातो. भारतीय पंचांगानुसार दिवाळी व दसरा या सणानंतर अक्षय तृतीया तिथीचा सण मोठ्या आनंदात साजरा केला जातो. शेतकरी वर्गासाठी तर हा दिवस आपल्या नवीन कामाचा शुभारंभ करण्याचा दिवस असतो. या दिवशी शेतकरी आपल्या घरातील सर्व सदस्यांसह शेतात जातात. त्याठिकाणी शेती कामासाठी उपयोगी पडणारे नांगर, फाळ, वखर इत्यादी अवजारांची यथायोग्य पूजा करून शेतातील कामाची सुरुवात करतात. जमिनीची भाजणी, ढेकळे फोडून वाफे तयार करणे, शेतातील तण वेचणे व कचरा जाळून नष्ट करणे इत्यादी कामे केल्या जातात. पूजाअर्चा विधी संपल्यानंतर शेताला शिजवलेला भात, हरबऱ्याची भाजी, दही व आंबील याचा नैवेद्य दाखविला जातो. शेतात बसून शेतकरी व त्यांच्या परिवारातील सर्व सदस्य वनभोजन करतात. बायका-पोरं शेतातील झाडाला दोरी बांधून संपूर्ण

दिवसभर झोका खेळण्याचा आनंद घेतात. याच दिवसापासून शेतकरी आपल्या शेतीसाठी सालगडीचा करार करतात. अक्षय्य याचा अर्थ कधीही क्षय न होणारा, नाश न पावणारे असा आहे. त्यास्तव हा दिवस प्रत्येकाने व्यापाराने शेतकऱ्यांनी आणि आपण सर्वजण मोठ्या आनंदाने साजरा करावे तसेच नवीन वर्षात काहीतरी चांगले काम करण्याचा संकल्प या दिवशी केल्यास त्यात आपणास नक्कीच यश मिळेल.

## 06) वटपौर्णिमा

हिंदू पंचांगानुसार ज्येष्ठ महिन्यात येणारी पौर्णिमा म्हणजे "वटपौर्णिमा" होय. ह्या दिवशी स्त्रिया वटपौर्णिमा नावाचे व्रत करतात व वडाच्या झाडाची पूजा करून खोडाला सुताची दोरी गुंडाळतात. विवाहित स्त्रिया आपल्या पतीला उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य प्राप्त व्हावे म्हणून वडाच्या झाडाची पूजा करतात. याविषयी आख्यायिका सांगितली जाते ती अशी

अनेक वर्षापूर्वी भद्र देशात अश्वपती नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला सावित्री नावाची कन्या होती. सावित्री अतिशय सुंदर, नम्र व गुणी मुलगी होती. सावित्री उपवर झाल्यावर राजाने तिला आपला पती निवडण्याची परवानगी दिली. सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा शाल्व राज्याचा धृमत्सेन नावाच्या अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून हरल्यामुळे आपल्या राणी व मुलासहित राजा जंगलात राहत होता. भगवान नारदाला सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच असल्याचे माहीत असते. त्याच्याशी लग्न करू नको असा सल्ला सावित्रीला देतात. पण सावित्री ते मान्य करत नाही आणि सत्यवानाशी विवाह करते. जंगलात येऊन ती नवऱ्याबरोबर सासू सासऱ्याची सेवा करू लागते. सत्यवानाचा मृत्यू जेव्हा तीन दिवसावर येऊन ठेपते तेव्हा ती तीन दिवस उपवास करून सावित्री व्रत आरंभिते. सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला असता सावित्री त्याच्या बरोबर जाते. लाकडे तोडता तोडता त्याला घेरी येते व तो जमिनीवर पडतो. यमधर्म तिथे येतो व सत्यवानाचे प्राण नेऊ लागतो. सावित्री यमाच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागते. यमाने अनेक वेळा सावित्रीस परत जाण्यास सांगती. पण तिने साफ नाकारते व पतीबरोबर जाण्याचा हट्ट धरते. अखेर कंटाळून यमाने पतीला सोडून देतो व तीन वर मागण्यास सांगतो. सावित्री मग सासू-सासऱ्याचे डोळे व राज्य परत मागते व आपल्याला पुत्र व्हावा असा वर देखील मागते. यमराज गफलतीने तथास्तु म्हणतो. तेव्हा त्याला वचनबद्ध झाल्याची आठवण होते व सत्यवानाचे प्राण

परत करावे लागते. सत्यवानाचे प्राण सावित्रीने वडाच्या झाडाखालीच परत मिळविले म्हणून ज्येष्ठ महिन्यात पौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करून उपवास करतात व वट सावित्री व्रत आचरतात.

वृक्षांचे संवर्धन आणि जतन व्हावे अशा हेतूने वृक्षांची पूजा करण्याची कल्पना भारतीय संस्कृतीने स्वीकारली असावी, असे वाटते. एखाद्या जातीचा वृक्ष एकदा पवित्र मानला की त्याची सहसा तोड होत नाही, हा ही विचार त्यामागे असू शकतो. पर्यावरणशास्त्राच्या दृष्टीने वडाचे महत्त्व विशेष असल्याने त्याच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा ही पूजेचा एक हेतू आहे. ब्रह्मदेवांचे ‘वड’ हे निवासस्थान आहे अशी हिंदू धर्मीयांची धारणा आहे. तसेच भगवान शिवांचेही या वृक्षावर निवासस्थान मानतात. योगी अरविंद यांनी आध्यात्मिक परिभाषेतून सावित्रीचे महत्त्व सांगणारे 'सावित्री' नावाचे महाकाव्य लिहिले आहे

( संकलित )

07) पंढरीची वारी - आषाढी एकादशी

सकाळी रेडियोवर पं.भीमसेन जोशी यांच्या आवाजातील माझे माहेर पंढरी ,आहे भीम रे त्या तिरी हे गाणे ऐकत ऐकतच उठायचो. लहान असल्यापासून या पंढरीच्या विठ्ठलाचे आकर्षण असायाचे त्याला कारण ही तसेच होते. माझे काका वारकरी संप्रदायतील होते ,त्यामुळे ते आषाढी एकादशीला पंढरीची वारी करून परत यायचे आणि येताना आम्हां लहान मुलांसाठी काही आणित असत. त्याचे आम्हाला उत्सुकता असायची. वर्षामागून वर्ष सरले आणि आम्ही मोठे झालो तसे या वारीचे आकर्षण कमी झाले. पण वारी समजू लागलो आणि वारी मध्ये जायचे असेल तर भजन करावे लागते ही अट गावातील चर्चेमधुन ऐकन्यास मिळाले. यामुळे भजन करण्याकडे वळलो .टाळ कधी हातात घेता आले नाही, मात्र हाताने टाळ वाजवायचो आणि भजनी मंडळात सामिल व्हायचो, असे शालेय जीवनात घडले. हे सर्व त्या पंढरीच्या विठोबाच्या दर्शनासाठी करायचो. शालेय जीवन संपले आणि महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर या भजना पासून दूर झालो. मात्र पंढरीचे आकर्षण कमी झाली नाही यामागे काय कारण असेल .....?

आषाढी एकादशी ही पंढरीची वारी पावासळ्याच्या तोंडावर येते. वारकरी मंडळी सहसा शेतकरी असतो आणि शेतात आपली पेरणी पूर्ण करून वारी साठी रवाना होत असतो. कधी कधी निसर्ग नियम मोडते आणि पेरणी करायला उशीर होतो. तरी शेतकरी आपली वारी चुकवत नाहीत. या वारीत बरेच काही शिकायला मिळते. मुंगी ज्याप्रमाणे वाटचाल करतात अगदी त्याच प्रकारे वारकरी आपल्या घरातून जथयाच्या जथ्थी निघातात आणि वारीत सामिल होतात. *शिस्त* ही त्यांच्या अंगात असलेली एक अत्यंत महत्वाचे गुण येथे दिसून येते. कुठल्याही प्रकारची सुरक्षा यंत्रणा नसताना ही वारकरी लोकांची स्वयंशिस्त पाहन्याजोगे असते. स्वतः तयार केलेली शिस्त असल्यामुळे ते मोडन्याचा प्रश्नच येत नाही.

या लोकांमध्ये अजुन एक महत्वाचे गुण दिसून येते ते म्हणजे इतरांना सहकार्य करणे .वारीमध्ये पायी चालत असताना अनेक समस्या निर्माण होतात पण त्याचे काहीच वाटत नाही .कारण वारी मधे लोक एकमेकांना सहकार्य करीत वाटचाल करीत असतात. त्यामुळे कोणालाही समस्या निर्माण झाली तरी त्याचे काही वाटत नाही .प्रेम करीत जा आपणास नक्कीच प्रेम मिळेल द्वेषातुन द्वेष च निर्माण होते याची प्रचिती सुद्धा या निमित्ताने येते .सासरी गेलेल्या मुलीला आषाढी च्या निमित्ताने माहेरी जाण्याचा योग येतो वर्षातील सणांची सुरुवात या सणाने होते जसी तिला माहेराचि ओढ़ लागलेली असते. अगदी तसेच वारकरी लोकांना पंढरीच्यावारीची ओढ़ लागलेली असते म्हणूनच म्हणावेसे वाटते पाऊले चालती पंढरीची वाटते, हरी ओम विठ्ठला

08) सण - गुरुपौर्णिमा




. . . . *माझे गुरू : एक आठवण* . . . . . .

आज आषाढ शुद्ध पौर्णिमा त्यास गुरू पौर्णिमा असे सुध्दा म्हटले जाते. आपल्या गुरूविषयी मनात आदरभाव निर्माण करून त्यांना वंदन व नमन करण्याचा हा दिवस. प्रत्येकाच्या जीवनात गुरूचे अनन्यसाधारण महत्व आहे. जो शिकवितो तो गुरू. मग तो लहान असो वा मोठा. आम्हाला शिकविलेले आमचे गुरुजी आम्हाला आज ही जशास तसे आठवतात. त्यांनी सांगितलेल्या प्रत्येक गोष्टी पदोपदी कामाला पडत आहेत. मला आठवते ते प्राथमिक शाळेतील मराठीचे गुरुजी. ज्या मुलांना मराठी वाचन करता येत नसे त्या मुलांना गुरूजी दिवसभर उन्हात उभे करायचे. पायात चप्पल नको, ना डोक्यावर टोपी. आपणास उन्हात उभे राहण्याची पाळी येऊ नये ही भीती मनात होती त्यामूळे गुरुजी धडा शिकविण्यापूर्वीच त्याचे 2-3 वेळा वाचन होत असे. उन्हाचा चटका मराठी वाचण्यास शिकविले, तशी शिक्षा करण्याची आज पध्दत नाही. शासनाने शिक्षेवर जशी बंदी आणली तशी गुरूजीचे आस्तित्व कमी कमी होत चालले आहे असे समाजात अधुन मधून बोलले जाते. शिक्षा केल्यामुळे

मुलामध्ये भीती निर्माण होऊन मूल न्यूनगंड होण्याची शक्यता असते. या मानसशास्त्राच्या दृष्टिकोनातून शाळेतुन छड़ी ला बाद करण्यात आले. म्हणजेच पूर्वी जे छड़ी लागे छम छम विद्या येई घम घम असा जो सुर ऐकू यायचा तो आत्ता बंद झाला आहे. मुले मोकळ्या मनाने नाचू बागडू लागली आणि शिक्षक मात्र डोक्याला हात लावून बसला आहे हे आजचे विदारक चित्र आहे. काही ठिकाणी याउलट पाहण्यास मिळते म्हणून सर्वत्र तसेच असेल असे छातीठोकपणे सांगता येत नाही. पूर्वी पाठातील प्रश्न-उत्तर विचारणे ही पद्धत फार कमी होती. वाचन आणि रोज एक पान मराठीच्या पुस्तकातील पाठाचे लेखन यावर गुरुजीचा जास्त भर होता. आज माझे अक्षर सुंदर असल्याचा मला खूप अभिमान वाटतो परंतु याचे सारे श्रेय माझ्या प्राथमिक वर्गातील गुरुजीला जाते. चौथ्या वर्गात तीस पर्यंत पाढे येणे आवश्यक होते. पाढे पाठ नसले की गुरुजी रट्टा द्यायचे. त्या रुळला भिऊन सगळे पाढे पाठ. त्याचा वापर गणिती क्रिया करताना होतो हे खूप उशिरा कळले. मात्र त्याचा फायदा झाला हे विशेष. प्राथमिक शाळेत आम्हाला खूपच कडक आणि शिस्तप्रिय गुरुजी मिळाल्यामुळे पुढील संपूर्ण शिक्षण त्याच पद्धतीने गेले. मात्र शिस्त कधी मोडली नाही म्हणून शिक्षा मिळाली नाही. वेळेवर शाळेत उपस्थित राहणे, गृहपाठ पूर्ण करणे, शिस्तीचे पालन करणे आणि गुरुजी ना आदराने बोलणे या सवयी माझ्या अंगात ज्या रुळल्या ते फक्त आणि फक्त गुरुजी मुळे. याच सवयी पुढे आयुष्यात कामाला पडत आहेत. म्हणूनच जीवनात गुरुजी चे स्थान फार महत्वाचे आहे असे वाटते.

प्राथमिक शिक्षण गावात होते. पुढील माध्यमिक शाळेत सुद्धा चांगले गुरुजी भेटले. प्राथमिक वर्गात जो पाया रचला गेला होता त्यावर याठिकाणी खूप चांगली बांधणी झाली. मुलांमध्ये विविध गुणांचा परिपोष व्हावे म्हणून या माध्यमिक शाळेत विविध स्पर्धा घेतले जात असत जसे की निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा यामूळे आपोआप माझ्या मध्ये निबंध लिहिण्याची प्रेरणा निर्माण झाली. आज मी जे लेखन करतो ते या माध्यमिक वर्गातले बीज आहे असे मला वाटते. वर्तमानपत्र किंवा मासिकात जेंव्हा माझा एखादा लेख प्रकाशित

होतो आणि माझे गुरुजी जेव्हा माझ्या पाठीवर हात फिरवून मला म्हणतात " बेटा, आजचा लेख खूपच सुंदर लिहिलास" तेंव्हा त्यांना जितका आनंद होतो त्यापेक्षा कितीतरी पटीने मला आनंद होतो. त्यांनी केलेल्या मार्गदर्शन आणि शिक्षणामुळे आज मी या स्थानावर आहे. मला पाहून किंवा माझे लेख वाचून माझ्या गुरुजीना आनंद वाटतो हे त्याच्या हावभाव वरून माझ्या लक्षात येते. तोच आनंद मी माझ्या विद्यार्थीमध्ये पाहतो. माझ्या गुरुजीचे ऋण मला फेडता येईल की नाही माहीत नाही. मात्र मी सुद्धा एक गुरुजीच आहे. त्यामूळे माझ्या गुरुजीप्रमाणे मी माझ्या विद्यार्थ्यांना शिकविण्याचा, ज्ञान देण्याचा प्रयत्न करतो. मी जसा शाळेत घडलो तसा माझा विद्यार्थी घडावा, यातूनच गुरुजीला खरे वंदन आहे असे मला मनातून वाटते. आज गुरु पौर्णिमेच्या शुभ दिवशी माझ्या सर्व गुरुवर्य मंडळींना वंदन करतो.

09) सण - नागपंचमी

साप :- शेतकऱ्यांचा मित्र

आपल्या पाटीवर भाजलेले खोबरे घासून घासून पाटीला काळेभोर करतोत आणि त्यावर नागाचे चित्र काढून त्याची यथोचित पूजा केली जाते. श्रावण शुद्ध पंचमीच्या दिवशी सर्वत्र नागाची पूजा केली जाते तो दिवस म्हणजे नागपंचमी. भारतीय संस्कृतीत पशू पक्षी वनस्पती प्राणी यांना आदराचे स्थान देऊन त्यांच्याशी एकप्रकारे आत्मीयता जोडण्याची प्रथा आहे. हिंदू धर्मात गाईला म्हटवचे स्थान असून त्यास गोमाता असे संबोधले जाते . मानवास उपयोगी पडणाऱ्या साधनांची पूजा केली जाते, हे आपणांस पटू शकते मात्र नाग म्हणजे साप आपणांस कोठे उपयोगी पडतो ? याउलट त्याने एखाद्याला दंश केल्यास त्यास जीव गमावण्याची शक्यताच अधिक असते. सापांच्या भीतीमुळे हा सण पूर्वजांनी चालू केली असेल काय ? असा प्रश्न मनात नक्कीच पडतो. पुरातन काळापासून भारतातील लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय होता आणि आता सुद्धा आहे. शेतात पिकणाऱ्या अन्नधान्याची जीवजंतू व उंदराकडून फार मोठ्या प्रमाणावर नासाडी होत असते. त्यामुळे अर्थातच शेतकऱ्यांचे नुकसान होऊन त्यांना फटका बसतो. परंतु या सापामुळे शेतातील जीवजंतू व उंदराचा बंदोबस्त होण्यास मदत मिळते व शेतीच्या उत्पन्नात वाढ ही होते. म्हणून सापाला शेतकऱ्यांचा मित्र असे सुद्धा म्हटले जाते. श्रावण महिन्याची सुरुवात म्हणजे शेतकऱ्यांच्या शेती करण्यास सुरू करण्याचे दिवस असतात. शेतात नेमकेच पीक येण्यास प्रारंभ होत असते. त्यास्तव मित्राला मदतीची याचना करण्यासाठी शेतातील जीवजंतू व उंदराचा करण्यासाठी आणि गतवर्षातील उपकाराची परतफेड करण्यासाठी त्यानिमित्ताने सापाची पूजा केली जात असावी, असे वाटते. महिला मंडळी सापाला आपले मानस भाऊ समजतात आणि त्यादिवशी त्यांच्याकडून वारूळाची पूजा केली जाते. साप उगीचच कोणाला दंश करत नाही. जो कोणी जो कोणी त्याला त्रास

देतील किंवा हैराण करतील त्यांनाच तो दंश करतो. विनाकारण कोणाला त्रास देऊ नये परंतु जर कोणी त्रास देत असतील तर वेळीच त्याला समज देण्याचा गुण या सापापासून आपणाला अंगिकारता येईल काय ? याचा प्रत्येकांनी जरूर विचार करावा. साप दिसले की प्रत्येक जण घाबरतात आणि घाबरून जाऊन त्या सापाला जिवंत कोणी ही सोडत नाही. पण असेच सापाची हत्या होत राहिले तर निसर्गचक्र जे आहे त्यात विस्कळीतपणा येण्याची शक्यता आहे. सूक्ष्मजिवापासून महाकाय प्राण्यापर्यंत प्रत्येकजण एकमेकांवर अवलंबून आहे. त्या चक्रातील एक जरी प्राणी नष्ट झाले तर इतर प्राण्यांची संख्या भरमसाठ वाढते जे की निसर्गाला धोका निर्माण करू शकते. म्हणून सापाला पाहून घाबरून जाऊ नका, तात्काळ ओळखीच्या सर्पमित्राला बोलावून त्याला जंगलात सोडण्याची व्यवस्था करा, ही सर्वांना नम्रतेची विनंती

10) सण – रक्षाबंधन




*राखी एक अतुट बंधन*

कुटुंबात आई वडिलांनंतर भाऊ बहिणीचे नाते अत्यंत महत्वाचे समजले जाते. आईच्या नंतरचे स्थान म्हणजे  बहिणीचे आहे. आपल्या भावाची खरी काळजी घेणारी ती बहीणच असू शकते. फार पूर्वीपासून या भाऊ आणि बहिणीचे नात्यावर आधारित गोष्टी रुपात बोलले जात आहे. कोणतेही जात असो, धर्म असो किंवा पंथ भाऊ बहिणीचे प्रेम प्रकर्षाने दिसून येते. त्याच भाऊ बहिणीचे एकमेकावरील प्रेम व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे रक्षाबंधन हा सण होय.

हा सण साजरा करण्यामागे पौराणिक दंतकथा सांगितली जाते. एकदा श्रीकृष्णाच्या करंगळीला दुखापत झाली आणि रक्तस्राव होऊ लागला. त्यावेळी त्यांच्या आजूबाजूला बहिण सुभद्रा आणि पाच पांडवाची धर्मपत्नी द्रोपदी उभे होत्या. हे पाहून सुभद्रा कुठे चिंधी सापडते काय म्हणून इकडे तिकडे शोध सुरु केली होती. त्याच वेळी द्रोपदीने मागेपुढे कसलेही विचार

न करता आपल्या अंगावरील भरजरी साडीचा पदर टर्रकन पाडून श्रीकृष्णाच्या करंगळीला बांधली तो दिवस म्हणजे रक्षाबंधन. तेंव्हा श्रीकृष्णानी द्रोपदीला वचन दिले की संकट काळात माझी आठवण कर मी मदतीला नक्की येईन. तसे वचन त्यांनी पाळले देखील. ज्यावेळी भर सभेत दुःशासन द्रोपदीचे वस्त्रहरण करण्यासाठी अंगावर हात टाकला त्यावेळी द्रोपदी मनोमन आपला भाऊ श्रीकृष्ण यांच्या धावा केल्या तेंव्हा श्रीकृष्णानीद्रोपदीला वाचविले. महाभारतातील हा प्रसंग आपणास चांगली शिकवण देतो की, बहिणीने भावाला साथ द्यावी आणि भावाने बहिणीची संकट काळात संरक्षण करण्याचे वचन नेहमी लक्षात ठेवावी.

आज देशात मुलींचे अपहरण, मुलींवर होत असलेले बलात्कार, विनयभंग आणि मुलींचे छेडछाड या प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यास विविध कारण देखील आहेत. महिलांना सायंकाळी सहाच्यानंतर घराबाहेर पडणे मुश्किल बनले आहे. तेंव्हा या उत्सवाच्या निमित्ताने समाजात एक चांगला संदेश जायला हवे. आपली अर्धांगिनी म्हणजे बायकोला सोडून बाकी सर्व माझ्या बहिणी आहेत ही भावना प्रत्येकांच्या मनात निर्माण होणे आवश्यक आहे. पर स्त्री माते समान हे धोरण राजे शिवाजी महाराजाच्या कारकिर्दीत सर्वांनी पाळले याचा इतिहास आपण वाचन करतो मात्र प्रत्यक्षात आपली वागणूक शून्य असते. आपण स्वतः आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे.

शाळेत असताना भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत ही प्रतिज्ञा रोज शपथेप्रमाणे घेतो. मात्र त्याचे अनुकरण प्रत्यक्षात करीत नाही. एका रक्ताचे भाऊ बहिणीनी प्रमाने रहावे यात काही वाद नाही मात्र समाजातील इतर मुलींदेखील माझ्या बहिणी आहेत असे जोपर्यंत समाजातील मुले म्हणणार नाहीत तोपर्यंत रक्षाबंधन सण खऱ्या अर्थाने साजरी केली असे होणार नाही. अगदी लहान वयापासून मुलांना आपल्या प्रत्येक बहिणीचे संरक्षण करण्याची जबाबदारी शिकविणे गरजेचे आहे. समाजातील अनिष्ठ प्रथा बंद करायचे असेल तर सर्वप्रथम आपल्या घरातील मुलांवर योग्य संस्कार टाकणे ही काळाची गरज आहे.

घराघरात भाऊ ज्या प्रकारे आपल्या बहिणीची काळजी घेतो तशी परिसरातील, गावातील, शहरातील, राज्यातील नव्हे देशातील मुलींची काळजी भावाने घेणे आवश्यक आहे. एखाद्या विवाहित स्त्रीला आपल्या पतीचा खुप मोठा आधार असते. स्वामी समर्थ यांच्या उक्तीनुसार 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे ' पती सदैव पत्नीच्या पाठीशी प्रत्यक्षात नसून देखील असल्याचा विश्वास असतो. तसे प्रत्येक मुलींना आपल्या भावाचा विश्वास निर्माण व्हावे असे वातावरण तयार करायलाच हवे.

आपल्या पारंपरिक पध्दतीनुसार असे विविध सण येतात, आपण मोठ्या आनंदात साजरी करतो. सर्वत्र उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण असते पण तो आनंद दीर्घकाळ टिकून राहत नाही. कारण आपल्या मधलाच एक भाऊ दुसऱ्या एका बहिणीवर अत्याचार करतो. निर्भया सारखे प्रकरण घडते. तिचे जीवन बरबाद करून टाकतो. क्षणभराच्या सुखासाठी राक्षस बनतो आणि तिच्या संपूर्ण आयुष्याची राखरांगोळी करतो. हे कुठे तरी थांबले पाहिजे आणि हे निश्चितपणे थांबू शकते. त्यासाठी प्रत्येक भावाने एक शपथ घ्यायला हवी की ' मी कोणत्याही स्त्रीकडे वाईट दृष्टीने पाहणार नाही. सर्व मुली माझ्या आई- बहिणी समान आहेत. हे परमेश्वरा माझ्या डोक्यात शुध्द आणि चांगले विचार येऊ दे.' असा विचार करून जो भाऊ रक्षाबंधन साजरी करीत आहे त्याच्या मनात यावर्षी एक वेगळीच भावना असेल एवढे मात्र निश्चित. आज समाजात सर्वत्र दु:शासन तयार होत आहेत तेंव्हा परत एकदा श्रीकृष्ण निर्माण होणे गरजेचे आहे, असे वाटते.

11) बैलांचा सण : पोळा




पुरणपोळी आणि पोळा


भारत हा कृषिप्रधान देश आहे. आपल्या देशातील बहुतांश लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. येथील 75 टक्के लोक ग्रामीण भागात, खेड्यात राहतात. ग्रामीण भागात शेतीशिवाय अन्य दुसरा काही व्यवसाय सध्या तरी अस्तित्वात नाही. शेती म्हटले की त्याच्यासोबत बैलाचा संबंध येणारच. बैलाशिवाय शेती करणे फारच अशक्य आहे ( आधुनिक यंत्रामुळे सध्या बैलांची संख्या कमी होत आहे ही बाब वेगळी ) प्रत्येक शेतकऱ्याकडे निदान एक बैलजोडी असतेच असते आणि त्याच बैलाच्या ताकदीवर तो शेतातील सर्व कामे करून घेतो. शेताची नांगरणी, वखरणी, पेरणी किंवा शेतातून घराकडे मालाची ने-आण करण्यासाठी या बैलांचा वापर केला जातो. पूर्वी दळणवळणाची सुविधा एवढी विकसीत झाली नव्हती तेव्हा शहरात जाण्या-येण्यासाठी बैलगाडीतून प्रवास करावा लागायचा. सायकल नावाची वस्तू फारच कमी जणांच्या घरी बघायला मिळत असे. पूर्वीच्या काळी लग्नकार्यात नवरदेव सायकलसाठी रुसून बसला

आहे असे आपण आज ऐकलं तर हसायला येते. याच बैलगाडीला 80 ते 90 च्या दशकात खूप मोठा दर्जा होता. एवढेच काय लग्नकार्याला जाणाऱ्या वऱ्हाडींना सुद्धा याच बैलगाडीचा आधार घ्यावा लागत असे. दवाखाना असो वा कोणाच्या सोयरीकीला जाणे असो प्रत्येकजण या बैलगाडीचा वापर करीत होते. आज तो काळ राहिला नाही. बैलांचा वापर आत्ता शेतीच्या कामापुरतेच मर्यादित राहिलेले आहे. प्रत्येक ठिकाणी उपयोगी पडणाऱ्या या बैलाचा सण म्हणजे पोळा. श्रावण महिन्यातील अमावास्येला पोळा हा सण साजरा केला जातो. प्रत्येक शेतकरी या सणाची आतुरतेने वाट पाहतात. आपल्या बैलाविषयी असलेले प्रेम, माया, जिव्हाळा त्यांच्या चेहऱ्यावरील आनंदात दिसून येते. आपल्या पोटच्या लेकरासारखे ते बैलाची निगा राखतात, काळजी घेतात आणि पोळ्याला ते सारे प्रेम पाहायला मिळते. तसे पाहिले तर पोळा सणांची चाहूल श्रावण महिना प्रारंभ झाला की या सणांचे वेध सुरू होतात.

श्रावण महिन्याविषयी प्रसिद्ध बालकवी एका कवितेत म्हटले आहे की, " श्रावणमासी, हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहिकडे." या महिन्यात पावसाचे सरासरी प्रमाण जास्त असते. पावसामुळे सर्वत्र हिरवीगार सृष्टी दिसते. जणू असे वाटते की निसर्गाने हिरवा शालू नेसला आहे. या महिन्यात सणांची नुसती रेलचेल असते. सर्वप्रथम येथे ती नागपंचमी. मुक्या प्राण्यांवर प्रेम करा आणि त्यांना आपले समजा असा संदेश यातून दिला जातो. त्यानंतर पौर्णिमेला येतो रक्षाबंधनाचा सण. भाऊ बहिणीच्या पवित्र प्रेमाची महती सांगणारा सण संपल्यानंतर महिन्याच्या शेवटी येणारा सण म्हणजे पोळा. श्रावण महिना प्रारंभ झाला की शेतकरी रोज सकाळी आपल्या बैलांना स्वच्छ पाण्याने धुतात आणि त्यांना चारापाणी करून शेताकडे नेतात. पूर्वी खूप पाऊस पडायचा. नद्या, नाले, तलाव तुडुंब भरलेले असायचे. म्हणून शेतकरी तलाव किंवा नदीवर बैलांना धुण्यास घेऊन जात असत. पण आज तेवढा पाऊसच नाही. तलाव किंवा नदी सोडा साध्या खड्ड्यात पाणी दिसत नाही त्यामुळे बैलांना आज फक्त घरीच बादलीभर पाण्याने धुण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

पोळा सणाची खरी सुरुवात आदल्या दिवशी होते त्यास खांदे मळणी असे म्हणतात. याच दिवसापासून बैलांना काम लावले जात नाही. बैलाच्या खांद्याला तूप किंवा लोणी लावून चोळले जाते. दुसऱ्या दिवशी सकाळी बैलांना स्वच्छ धुतले जाते आणि त्यानंतर त्यांची शिंगे रंगविली जातात. कपाळावर भिंगे लावतात. अंगावर झूल घालतात. गोंडे बांधतात आणि त्यास जंगलात चरवण्यास घेऊन जातात. गावातील मानकरी यांच्या हस्ते सायंकाळी पाच बैलांची पूजा केली जाते आणि पोळा फुटतो. तेथून शेतकरी आपले बैल घेऊन गावभर फिरत घरी येतात. गृहलक्ष्मी त्या बैलांची पूजा करते, मंत्र म्हटले जातात आणि बैलाला पुरणाचा नैवेद्य खाण्यास दिला जातो. आपल्या मित्रांना व नातलगांना पुरणपोळीचे मेजवानी देतात. वर्षभर बैलांनी आपल्या शेतात केलेल्या कष्टाचे कृतज्ञता व्यक्त करणे म्हणजे आपला हा पोळा होय.

12) सण - गणेश चतुर्थी




गजानना श्री गणराया. . . . . .

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ:

निर्विघ्नम कुरुमे देव सर्व कार्येशू सर्वदा


आपल्या सर्वांचा लाडका देव म्हणजे गणपती बाप्पा. देव कसला आपण तर त्यांना माय फ्रेंड गणेशा असे म्हणता. पुढच्या वर्षी लवकर या असा निरोप दिल्यामुळे गणेशोत्सव कधी एकदा येतो याची आपणाला उत्सुकता लागलेली असते. प्रत्येक शुभ कार्यात मग तो लग्न समारंभ असो वा  लक्ष्मीपूजन असो, कोनशिला समारंभ असो वा  वास्तू शांती असो की

सत्यनारायणाची पूजा असो त्यात सर्वसाधारपणे सर्वप्रथम श्री गणेशाची पूजा केली जाते. म्हणूनच श्री गणेशाला आद्य दैवत म्हटले जाते. हिंदू धर्मातील लोकांच्या उंबरठय़ाकडे लक्ष दिल्यास एक बाब प्रकर्षाने जाणवते ते म्हणजे घराच्या  चौकटीतील वरच्या आडव्या लाकडी फटीवर श्री गणेशाची मूर्ती कोरलेली दिसते. त्याशिवाय घराला घरपण येत नाही. ज्यांच्या घराच्या चौकटींवर श्री गणेशाची मूर्ती नाही असे घर शोधून सुध्दा सापडणार नाही. घरातून बाहेर पडताना आपण कोणत्या कामांसाठी बाहेर जात आहोत ?  स्वार्थासाठी की निस्वार्थ कामांसाठी जात आहोत यांची नोंद चौकटींवर विराजमान असलेले श्री गणेशा करतात, असे पुराणात सांगितले आहे. त्याचमुळे घराबाहेर पडताना वडील मंडळी विशेष करून महिला नेहमीच चौकटीचे दर्शन घेतांना आढळून येतात व ठरविलेले काम वेळेत पूर्ण होवो अशी प्रार्थना श्री गणेशाजवळ करतात.

तसे पाहिले तर प्रत्येक महिन्याच्या कृष्ण पक्षातील चतुर्थीला घरात श्री गणेशाची पूजा केली जाते. मात्र भाद्रपद महिन्यातील शुद्ध चतुर्थीला घराघरात श्री गणेशाच्या मूर्तीची स्थापना करून विधिवत त्यांची पूजा केली जाते. याच दिवसाची आबाळापासून ते वृद्धांपर्यंत सर्वचजण आतुरतेने वाट पाहतात.  हत्तीचे सोंड असलेले तोंड, सुपासारखे मोठे कान, बारीक डोळे, अगडबंब पोट आणि त्याचा लहानसा वाहन मुषकराज या सर्वाविषयी आपल्या मनात कमालीची उत्सुकता असते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात घरोघरी श्री गणेशाची स्थापना केली जात असे असा उल्लेख इतिहासात आढळते. ज्या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केली तो उद्देश आज सफल होत आहे काय ? गणेश मंडळानी समाजातील दानशूर लोकांकडून गणपतीच्या नावाने चंदा गोळा करतात. मात्र त्यातून काही तरी विधायक कार्य त्यांच्या हातून होते काय ? समाजातील काही गरजू लोकांना मदत दिली जाते काय ? जमा झालेला पूर्ण पैसा कसा संपविता येईल याच विचारामध्ये ही मंडळ गर्क असतात. काही गणपतीच्या पाठीमागे पत्ते खेळण्यासारखे नसते उद्योग चालतात. विसर्जनाच्या दिवशी जो गोंधळ पाहायला मिळतो, ते नकोच वाटते. हे सर्व प्रकार बंद होऊन काही शैक्षणिक किंवा

सामाजिक संदेश देणारे कार्यक्रमाचे आयोजन मंडळानी करणे आवश्यक आहे. सदरील उत्सवाच्या माध्यमातून समाजात एकी निर्माण व्हावी हा उद्देश्य डोळ्यासमोर असायला हवा. म्हणजे विविध जातीचे लोक यानिमित्ताने एकत्र यावी असा एक अंदाज लावला जात होता. मात्र वास्तव जे दिसते ते भयानक आहे. आज प्रत्येक वेगवेगळ्या जातीचा एक गणेश मंडळ निर्माण होत आहे. म्हणजे एकता निर्माण होण्याऐवजी लोक एकमेकापासून दुरावल्या जात आहेत. जो प्रेम आणि जिव्हाळा पूर्वीच्या उत्सवात दिसत होता तो आज रंगाच्या झेंड्यामध्ये विभागला गेला आहे. पूर्वी एक गांव एक गणपती उपक्रम गावोगावी राबविण्यात आले. त्याचे परिणाम देखील चांगले दिसून आले होते. शहरात मात्र ही योजना कधीही निर्माण होऊ शकली नाही. निदान वॉर्ड निहाय एक गणपती मंडळ असणे आवश्यक होते. पण वॉर्ड तर सोडा गल्ली मध्ये तीन चार गणेश मंडळ गणपती बसवितात. चंदा देण्यापासून तर रोज रात्री दहा वाजे पर्यंत चालणारा त्याचा डी जे चा आवाज त्याचा त्रास सर्वांना होतो. या काळात मुलांचा अभ्यासाकडे लक्ष लागत नाही. रात्री उशिरापर्यंत गणपती जवळील कार्यक्रम बघण्यात वेळ निघुन जातो. खरोखर या बाबीचा विचार करण्याची वेळ आपणावर आलेली आहे. या दिवसांत " गजानना श्री गणराया, आधी वंदू तुज मोरया " या गीतांने सर्वत्र चैतन्यमय वातावरण होत असताना काळजी किंवा चिंतेचे वातावरण होऊ नये याची काळजी प्रत्येकानी घेणे आवश्यक आहे. तेंव्हा बोला एकदाचे गणपती बाप्पा $$$$ मोरया $$$$$$.

13) सण – दसरा




*दसरा सण मोठा*

दसऱ्याच दुसरं नाव आहे विजयादशमी. अज्ञानावर ज्ञानाने, शत्रूवर पराक्रमाने, वैऱ्यावर प्रेमाने विजय मिळवायचा. आंनद, समाधान आणि सोबत संपदा मिळवून आणायची. यश किर्ती प्राप्त करायची धनसंपदा लुटायची आणि लुटवायची हा दिवस.

दसरा ह्या सणांचं मोठ्या उत्साहाने स्वागत होते. हा साडेतीन मुहुर्तातला एक मुहुर्त म्हणूनच दसऱ्याच्या मुहुर्तावर नवी खरेदी, नवे करार, नव्या योजनांच्या प्रारंभ इ. चांगल्या गोष्टी केल्या जातात. घर, गाडी, बंगला, खरेदी केला जातो. सोन्या - चांदीचे दागिने केले जातात. नवे व्यवसाय चालू केले जातात. नवी नाटके, चित्रपट ह्यांचे मुहुर्त होतात. पुस्तकं प्रकाशित केली जातात.

ह्या दिवशी घरोघरी मिष्टान्नाचा बेत केला जातो. संध्याकाळी आपट्याची पाने सोनं म्हणून लहानांनी मोठ्यांना द्यायची. त्यांच्या पाया पडायचे आणि लाख मोलाचे आशिर्वाद घ्यायचे ते ही ह्याच दिवशी.

आपट्याच्या पानाला सोन्याचं मोल का आणि कसं आलं ह्याबद्दल जी एक कथा सांगितली जाते, ती अशी की

फार फार वर्षापूर्वी वरतंतू नावाचे एक गुरू आपल्या आश्रमात शिष्यांना ज्ञानदान करत होते. बराच मोठा शिष्यवर्ग त्यांचेकडे वेदाभ्यास, शास्त्राभ्यास करीत होता. एकदा काय झालं. गुरू वरतंतू ह्यांचेकडे शिकणाऱ्या त्यांच्या एका कौत्स नावाच्या शिष्याने त्यांना विचारले – गुरूजी ! तुम्ही आम्हाला एवढे ज्ञान दिले. शहाणे केले, त्या बदल्यात आम्ही तुम्हाला कोणती गुरुदक्षिणा द्यावी ? त्यावर गुरु वरतंतू म्हणाले, "बाळ कौत्सा, अरे ज्ञान हे दान करायचे असते. त्याचा बाजार किंवा सौदा करायचा नसतो. अरे तुम्ही शहाणे झालात, ज्ञानी झालात, हीच माझी गुरुदक्षिणा ! " पण कौत्स मात्र ऐकेनाच, सारखा मी काय देऊ? असे विचारू लागला, मग गुरु म्हणाले, "मी तुला चौदा विद्या शिकवल्या म्हणून तू मला चौदा कोटी सुवर्ण मोहरा दे." कौत्साला वाटलं की आपण एवढं धन सहज कमवू पण प्रत्यक्षात ते जमेना. मग कौत्स रघुराजाकडे गेला आणि त्यांना चौदा कोटी सुवर्ण मोहरांची मागणी केली. पण रघुराजाने त्या आधीच आपली सर्व संपत्ती दान केली होती. दारी आलेल्या याचकाला परत पाठवायचं नाही म्हणून राजानं कौत्साला 'तू तीन दिवसांनी ये' असं सांगितलं.

रघुराजानं कुबेराकडे वसुलीसाठी निरोप पाठवला. धन येईना, मग रघुराजाने युद्धाची तयारी केली. ही वार्ता इंद्राला कळली. इंद्र घाबरला, त्यानं कुबेराला रघुराजाच्या नगरीच्या वेशीवर असणाऱ्या आपट्याच्या वृक्षांवर सुवर्णमुद्रांचा पाऊस पाडायची आज्ञा दिली. दुसरे दिवशी रघुराजाला त्या सुवर्ण मुद्रांच्या पावसाची गोष्ट कळली. त्यानं स्वतः त्या मुद्रांचा ढीग पहिला. दारी आलेल्या कौत्साला 'हवं तेवढं धन घे' म्हटलं पण त्याने गुरुदक्षिणे पुरतेच धन

घेतले. बाकीच्या सर्व सुवर्णमुद्रा राजानं प्रजेला वाटल्या. लोकांना आपट्याच्या झाडाखाली ते धन मिळालं तो दिवस दसऱ्याचा होता. त्या प्रसंगाची आठवण म्हणून आपट्याच्या पानाला ह्या दिवशी सोनं म्हणून देतात-घेतात. ह्या दिवशी शस्त्र पूजा सुद्धा करतात. पाटीवर सरस्वती काढून तिची पूजा करतात. पराक्रमाचा आनंद देण्या-घेण्याचा परस्परांत प्रेम वाढवण्याचा हा एक सुंदर दिवसाचा सण म्हणजे दसरा. या दिवशी बऱ्याच ठिकाणी रावणाच्या पुतळ्याला दहन केले जाते. एक प्रतिकात्मक क्रिया होय, ज्यातून संदेश दिला जातो की, आपल्या मनातील वाईट प्रवृत्तीला जाळून टाका किंवा नष्ट करा. ग्रामीण भागात ह्या दिवशी गावातील काही प्रतिष्ठित मंडळी ढोल ताशे वाजवत गावाच्या सीमेवर जाऊन त्याठिकाणी शमीच्या झाडाचे पूजन करतात. त्याच ठिकाणी सोनं लुटण्याचा कार्यक्रम संपन्न होतो. गावात येऊन प्रत्येक देवतेला ते लुटलेले सोने अर्पण केले जाते मग स्वतःच्या घरी आल्यावर घरात त्यांचे कुंकू लावून स्वागत केले जाते आणि घरातल्या देवाला ते सोने अर्पण केले जाते. एकमेकांना प्रेम वाटण्याची एक सुंदर कल्पना या दसरा सणाच्या माध्यमातून दिला आहे. काही लोकं आपल्या पूर्वजांना आठवण करीत दसरा सणाच्या अगोदर मानाई नावाचा सण करतात. ज्यात वाड वडिलांना नवे कपडे चढविले जातात तर दसऱ्याच्या दिवशी लहान मुलांना नवे कपडे दिले जातात. एकूणच कुटुंबात सुखाचे, समृद्धीचे आणि आनंदाचे वातावरण तयार करण्यासाठी हा सण येतो. म्हणून म्हणावेसे वाटते.


दसरा सण मोठा

नाही आनंदाला तोटा

आला आला दसरा

आता दुःख सारे विसरा

14) कोजागिरी पौर्णिमा




शरद ऋतूमध्ये कोजागिरी पौर्णिमा हा सण मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. यादिवशी चंद्र पृथ्वीच्या सर्वात जवळ असतो. कोजागरी पौर्णिमा बहुधा ऑक्टोबर महिन्यामध्ये असते. आश्विन पौर्णिमा ही कोजागरी पौर्णिमा किंवा शरद पौर्णिमा म्हणून ओळखली जाते. आश्विन महिन्यात पावसाळा संपून आकाश निरभ्र होते. ही पौर्णिमा पावसानंतरची पहिली पौर्णिमा होय. पावसात आकाश स्वछ नसते परंतु या पौर्णिमेला आकाश खूप दिवसानंतर स्वछ आणि सुंदर दिसते. त्यामुळे याचा आनंद घेता यावा व याचे स्वागत करावे म्हणून हा सण साजरा करतात. अशी आख्यायिका सांगतात की उत्तररात्री साक्षात लक्ष्मीदेवी येऊन 'को जागर्ति' म्हणजे 'कोण जागत आहे' असे विचारते, म्हणून या दिवसाला 'कोजागरी पौर्णिमा'

म्हणतात. कोजागरी पौर्णिमेच्या मध्यरात्री देवी महालक्ष्मी आपल्या करकमलांमध्ये वर आणि अभय घेऊन भाविकतेने आपले व्रत करणाऱ्याला प्रसन्न होते. जो मनुष्य जागून माझी पूजा करत असेल त्याला मी अपार अपार धन-धान्य देईन, असे ती म्हणते.

याविषयी पुरातन काळातील एक कथा सांगितली जाते. प्राचीन काळी मगध देशात वलित नावाचा एक संस्कारी परंतु दरिद्री ब्राह्मण राहत होता. ब्राह्मण जेवढा सज्जन होता त्याची पत्नी तेवढीच दुष्ट होती. ती ब्राह्मणाच्या गरिबीमुळे दररोज त्याला त्रास देत होती. संपूर्ण गावात ती तिच्या पतीची निंदा करत असे. पतीच्या विरुध्द आचरण करणे हाच तिने आपला धर्म मानला होता. एवढेच नाही तर पैशाच्या हव्यासापोटी ती आपल्या पतीला चोरी करण्यासाठी प्रोत्साहित करत होती. एकदा श्राद्ध करताना ब्राह्मणाच्या पत्नीने पूजेमध्ये ठेवलेले सर्व पिंड उचलून एका विहिरीत फेकून दिले. पत्नीची अशी वर्तणूक पाहून दुःखी मनाने ब्राह्मण जंगलात निघून गेला. जंगलात गेल्यानंतर त्याला तेथे नागकन्या भेटतात. त्या दिवशी अश्विन मासातील पौर्णिमा होती. नागकन्यांनी ब्राह्मणाला रात्री जागरण करून लक्ष्मीला प्रसन्न करण्याचे कोजागर व्रत करण्यास सांगितले. ब्राह्मणाने विधिव्रत कोजागर व्रत केले. या व्रताच्या प्रभावाने ब्राह्मणाला अपार धन-संपत्ती प्राप्त झाली. भगवती लक्ष्मीच्या कृपेने त्याच्या पत्नीचीही बुद्धी शुद्ध झाली आणि ते दाम्पत्य सुखाने संसार करू लागले.

उत्तररात्रीपर्यंत जागरण व्हावे म्हणून लहान मुले विविध खेळ खेळतात, काहीजण अंताक्षरी खेळतात, काहीजण भजन करतात, महिला मंडळी विविध प्रकारचे खाद्य पदार्थ तयार करण्यात व्यस्त राहतात. या दिवशी गच्चीवर किंवा अंगणातील खुल्या मैदानात दूध गरम करतात, त्यात केशर, बदाम, चारोळ्या, वेलदोडे, जायफळ, साखर वगैरे गोष्टी घालून दूध घट्ट केल्या जाते. त्यानंतर लक्ष्मीदेवीला व चंद्राला आटीव दुधाचा नैवेद्य दाखवतात. दुधात मध्यरात्री पूर्ण चंद्राची किरणे पडू देतात आणि ते दूध मग प्राशन केले जाते. ज्याप्रकारे सूर्यप्रकाशाचा आपल्या आरोग्यावर प्रभाव पडतो ठीक त्याचप्रकारे या पौर्णिमेला चंद्राच्या

प्रभावाने आपल्याला आरोग्यदायी लाभ होतो. यामुळे काही काळ आकाशाखाली चंद्रप्रकाशात अवश्य बसावे. या उपायाने त्वचा उजळते आणि मनाला शांती मिळते. जर तुमची डोळ्यांची शक्ती कमी झाली असेल तर कोजागिरी पौर्णिमेच्या रात्री थोडावेळ चंद्राकडे बघितले तर तुमच्या डोळ्यांची शक्ती वाढते, असे जुने जाणकार लोक सांगतात.

विविध राज्यातील कोजागिरी

कोजागरी पौर्णिमा गुजरातमध्ये  रास व गरबा खेळून 'शरद पुनम' नावाने साजरी केली जाते. बंगाली लोक याला लोख्खी पुजो म्हणतात व या दिवशी लक्ष्मीची पूजा करतात. मिथिलेमध्ये या रात्री कोजागरहा पूजा केली जाते. राजस्थानी स्त्रिया या दिवशी शुभ्र वस्त्र नेसून चांदीचे दागिने घालतात. धार्मिक वृत्तीचे राजपूत या रात्री चंद्राची पूजा करून शेतकऱ्यांना शर्करायुक्त दूध देतात. हरियाणामध्ये आश्विन पौर्णिमेला दुधाची खीर बनवून ती रात्री चांदण्यात ठेवतात व सकाळी खातात. आपल्या संस्कृतीमध्ये वातावरणाला अनुसरून सण साजरे केले जातात. त्याचे अध्यात्मिक सोबत वैज्ञानिक महत्व देखील आहे. फक्त ती शोधक वृत्ती जागे ठेवावी लागते.

( संकलित )

15) सण - दिवाळी




आनंदोत्सव दीपोत्सव

दिवाळी सण मोठा, नाही आनंदा ला तोटा. वर्षातून एकदाच येणाऱ्या दिवाळी सणाची आबालापासून वृध्दापर्यंत सर्वानाच या सणाची चातक पक्ष्याप्रमाणे प्रतीक्षा असते. दसरा सण संपला की, सगळ्यानाच दिवाळी सणाचे वेध लागतात. लहान मुलांना तर दिवाळी हा सण कधीच संपू नये असे वाटते. कारण ना शाळेची कटकट असते ना अभ्यासाची पिरपिर. फक्त खेळणे, उड्या मारणे, फटाके उडविणे आणि आईने तयार केलेला फराळ फस्त करणे एवढेच काम राहते. दिवाळी सण भारतातच नाही तर विदेशात सुध्दा खुप प्रसिध्द आहे.

दिवाळीच्या पूर्व संध्येवर देश-विदेशात स्थलांतरित झालेली अनेक पाखरे ( जनता ) परत आपल्या घराकडे /गावकडे येतात. जुन्या व खास लोकांच्या गाठीभेटी दिवाळी सणाला होतात. त्यामुळे दिवाळी सण आला की, बहुतांश लोक आपल्या मुळ गावी परतण्याचा बेत आखतात. तसे इतर सण एकाच दिवसात संपतात ; मात्र दिवाळी हा सण तब्बल पाच दिवसाचा असतो.

त्याच मुळे या सणाची प्रत्येकानाच ओढ लागलेली असते. शिकण्यासाठी परगावी गेलेली मुले आणि सासुरवाशीन महिलेला घर आणि गाव याच्या भेटीची उत्सुकता दिवाळी सणाच्या निमित्ताने असते.

मराठीच्या आश्विन महिन्यातील शेवटचे तीन दिवस आणि कार्तिक महिन्यातील सुरुवातीचे दोन दिवस असा हा पाच दिवसाचा दिवाळी सण आहे. प्रत्येक दिवस वेगळ्याच नावाने आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. दिवाळीचा पहिला दिवस हा धनत्रयोदशीचा. या दिवशी धन्वंतरीचे पूजन केल्या जाते. धन्वंतरी हे आरोग्याचे अधिष्ठात्री दैवत असल्याने त्याच्या सेवेमुळे दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्य लाभते म्हणून आरोग्याची देवता असलेली धन्वंतरीची पुजा अर्चा करून सायंकाळी यम दीपन करण्यासाठी घरोघरी दीपोत्सव केला जातो आणि दिवाळी सणास प्रारंभ होते.

दिवाळीचा दुसरा दिवस म्हणजे नरकचतुर्दशीचा. हा दिवस म्हणजे जगातील पहिला सामुदायिक स्त्री मुक्ती दिन होय. कारण नरकासुराने पळवून नेलेल्या सोळा हजार स्त्रियांना श्रीकृष्णाने नरकासुराला ठार करून मुक्त केले व त्याच दिवशी त्यांचे पालकत्व घेतले. त्यांना सन्मानाचे जीवन प्राप्त करून दिले. यातून जगातील तमाम मानवास आदर्श घालून दिला आहे की, आपल्या देशात जेंव्हा स्त्री भ्रष्ट होते म्हणजे देश ही भ्रष्ट होतो, असे समजले जाते. नरकासुर राक्षसाचा वध करण्यात आला. त्याचा आनंद म्हणून महर्षी व्यासानी व पूर्वजानी हा दिवाळीचा सण सुरु केला आहे. उत्सव म्हणून लोक पहाटे उठून अभ्यंगस्नान करतात.

व्यापारी मंडळीच्या दृष्टीने तिसरा दिवस फारच महत्वाचा असतो. अमावस्येच्या दिवशी सर्व व्यापारी मंडळी आपल्या दुकानातील सामनाची साफसफाई करून लक्ष्मीची पूजा मांडतात व पूजा अर्चा करतात. काही गृहिणी आपआपल्या घरी लक्ष्मीमातेची पूजा करतात व साळीच्या लाह्या प्रसाद म्हणून वाटतात. लक्ष्मीपूजन झाल्यानंतर खूप फटाके वाजवून आपला आनंद व्यक्त केला जातो.

त्यांनंतरचा दुसरा दिवस कार्तिक महिन्यातील पहिला दिवस म्हणजे दिवाळी, त्यास बलिप्रतिपदा असे देखील म्हटले जाते. ग्रामीण भागात या दिवसाला पाडवा असे म्हणतात. या दिवशी सर्वचजण सकाळी लवकर उठून अंगाला उटणे लावून अभ्यंगस्नान करतात. नविन कपडे परिधान करून एकमेकांना शुभेच्छा देताना दिवाळीच्या फराळाचे आमंत्रण दिले जाते. लाडू, अनारसे, शंकरपाळे, करंज्या, चिवडा, शेव इत्यादी दिवाळीच्या फराळातून सर्वांना प्रेम वाटण्याचा प्रयत्न केला जातो.

आपल्या प्राणप्रिय भावाला उदंड आयुष्य लाभो, अशी देवाजवळ प्रत्येक बहीण प्रार्थना करते, भावाची ओवाळणी करते तो दिवस म्हणजे दिवाळी सणातील सर्वात शेवटचा भाऊबीजेचा सण. अश्या रीतीने पाच दिवस चालणाऱ्या उत्सवामुळे प्रत्येकाच्या मनात आनंदाची उधाणाची भरती येते.

ही आनंदोत्सवाची, दीपोत्सवाची दिवाळी प्रत्येकाच्या जीवनात खुप आनंद, यश, भरभराटी, उत्कर्ष आणि उत्साह देऊन जावो हीच शुभेच्छा....!

16) गीता जयंती

गीता जीवनाचा एक मार्गदर्शक

*" कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन "*

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषू कदाचन अर्थात फळाची आशा न करता कर्म करीत जा असे पवित्र ग्रंथ श्रीमद्भगवद्गीतेत सांगितले आहे. पाच हजार वर्षापुर्वी मार्गशीर्ष शुद्ध एकादशीच्या सुप्रभाती कुरुक्षेत्राच्या रणांगणावर अर्जुनाला समोर ठेऊन संपूर्ण मानवमात्राला जीवनाभिमुख करणेस्तव श्रीकृष्णाने आपल्या मुखारविंदातून जे जीवनाचे सार मांडले ती म्हणजे गीता. *आज गीता जयंतीचा दिवस*. भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात ही जयंती मोठ्या उत्साहात व आनंदात साजरी करतात. गीता ही भगवंताने स्वतः गायिली आहे, हेच याचे प्रमुख वैशिष्ट्ये आहे. गीता हे वैश्विक ग्रंथ आहे. गीता ही मानव धर्मासाठी आहे, त्यावर आधारीत मानव आपले आदर्श असे आयुष्य जगू शकतो. मानवाचे जीवन चरितार्थ कसे असावे ? याबाबत मोलाचे मार्गदर्शन यात सांगितले आहे. "योगक्षेमं वहाम्यहम"ची संकल्पना यात दिसून येते. अहं ब्रम्हास्वी ची जाणीव सुद्धा मिळते. लहान थोरांपासून वृद्धांपर्यंत ,साधू संन्यासापासून संत महात्म्यापर्यंत च्या सर्वच लोकांना मार्ग यातून मिळतो. हीच गीता लोकांना सहज समजावी म्हणून संत ज्ञानेश्वरानी मराठी मायबोलीतून 'ज्ञानेश्वरी'लिहली. गीता ही प्रत्येकासाठी पथदर्शी आहे. मानवाला लाभलेले जीवन खुप अनमोल आहे म्हणून जीवनात रडण्यापेक्षा हसण्याला जास्त महत्व द्यावे. संकटाला भिवून पळण्यापेक्षा त्यास तोंड देण्याची सशक्ती या गीतेतून मिळते.

एखाद्या कामात यश मिळाले नाही की व्यक्ती निराश होतो. परंतु निराश न होता अधिक शक्तिने प्रयत्न केल्यास त्यात नक्कीच यश मिळते. निराशेच्या अंधारात भटकणाऱ्या मानवाच्या जीवनात गीता प्रकाश पसरवते. अपयश ही यशाची पहिली पायरी आहे, याची शिकवण सुद्धा गीता देते. निरुत्साही माणसाला उत्साह मिळवून देते. मानवाला स्वतः वरील श्रद्धा नष्ट होऊ

देत नाही. वारंवार स्वतः चा आत्मविश्वास जागृत करीत राहते. त्यामुळे मानव जीवनात विफल होत नाही व अपयशातुन यश मिळविण्याचा प्रयत्न करतो. समाजातील प्रत्येक व्यक्तीला गीता जीवन जगण्याचा आदर्श मार्ग सांगते. त्या मार्गावरुन गेलेला व्यक्ती आजपर्यंत असफल झाला नाही.

गीतेत एकूण 18 अध्याय असून 700 श्लोक आहेत. प्रत्येक अध्यायाला एक विशिष्ट असे नाव आहे जसे की बाराव्या अध्यायाला भक्तीयोग असे नाव आहे ज्यात भक्ती चे वर्णन केलेले आहे.

मानवाचे जीवन बालपण, तारुण्य व वार्धक्य या तीन अवस्थेतून जातो तेव्हा तो काही महत्त्वाचे गुण स्वीकारूनच दुसऱ्या अवस्थेत प्रवेश करतो. बालपणात बालक असून बालिश नाही, तरुण बनेल परंतु उत्श्रृंखल नाही, वृद्ध होईन परंतु निराश नाही ही जीवनाची त्रिसूत्री गीतेतून मिळते . जीवनात प्रत्येक मनुष्य मृत्यूला घाबरतो. मरण कोणालाच नको वाटते. परंतु जन्म घेणारा प्रत्येक जीव मरतोच, याची जाणीव गीता लोकांना करून देते त्यामुळे माणूस हसत-हसत मृत्यूचे स्वागत करतो. भगवे कपडे अंगावर टाकले की कोणी संन्यासी होत नसतो त्यासाठी मनावर भगवे कपडे टाकण्याची गरज आहे. खरा संन्यासी बनण्यासाठी त्याग, बलिदान आणि समर्पणाची भावना गीतेतून सांगण्यात आली. तरीही काही साधू, संन्यासी ढोंगीपणा करून समस्त समाजाला दुःख पोहोचवितात . त्यास्तव एका संताने म्हटले की '' काय भुललासि वरलिया रंगा .'' नुसते बाह्यरूप पाहून कोणाचे शिष्य न होता प्रथम त्याचे सर्व ज्ञान जाणून घ्यावे आणि त्यानंतर योग्य दिशा ठरवावी. जसे आपले कर्म असतील तसेच आपणाला फळ मला राहतील. करावे तसे भरावे या म्हणीप्रमाणे. तंबाखुचे बी लावून कापसाच्या पिकाची अपेक्षा ठेवताच येत नाही असे गीता सांगते .

स्त्रियांच्या बाबतीत गीता सांगते ,''कीर्ती श्रार्वाक नारीच , " स्मृतिमेर्धा , धृती : क्षमा : " अर्थात लज्जा हा स्त्रीचा खरा दागिना आहे व मर्यादेतच तिचे सौदर्य साठवलेले आहे. स्त्रीची

वाणी प्रेमळ, पावन आणि प्रेरक असली पाहिजे. स्त्री ही महान कार्य करायला जन्मलेली आहे याची तिला स्मृती असायला पाहिजे आजच्या काळातही वरील ओळ तंतोतंत जुळत नाही का ?

विद्यार्थी कसा असावा ? या बाबतीत गीता सांगते " तद्विध्दी प्रणिपातेन परीप्रश्नेन स्रेचया : अर्थात विद्यार्थी म्हणजे ज्ञान घेणारा, ज्ञान प्राप्त करणारा. जर त्याला विद्या मिळवायची असेल तर त्याच्याकडे प्रणिपात म्हणजे नम्रता, परीप्रश्न म्हणजे जिज्ञासा आणि सेवा या तीन बाबी त्यांच्या जवळ असाव्याच लागतात. नम्रतेशिवाय ज्ञान मिळतच नाही. जर मिळालेच तर टिकत नाही टिकलेच तर शोभत नाही. म्हणूनच म्हटले आहे . "विद्या विनयेन शोभते ." आजचा विद्यार्थी असा आहे का ? आजन्म विद्यार्थी राहायचे असेल तर वरील तीन बाबी आपणच असावेच लागतात .

गुरुच्या बाबतीत सांगताना गीता म्हणते की, "उपदेक्ष्यन्ति ते ज्ञान ज्ञानिनस्तवं दर्शिन" अर्थात ज्ञानाचा उपदेश करणारा मनुष्य ज्ञानी आणि तत्वदर्शी असला पाहिजे. गुरु हा विचाराने विद्वान आणि आचाराने सज्जन असला पाहिजे. साधी राहणी पण उच्च विचारसरणी असलेल्या गुरुला समाजात मानाचे स्थान मिळवावे लागत नाही तर ते आपोआपच प्राप्त होते. गुरुनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजकल्याणासाठी करावा. संतानी म्हंटल्याप्रमाणे "जे जे आपणासि ठावे, ते ते इतरांशी सांगावे, शहाणे करुन सोडावे सकळजन". या उक्तिप्रमाणे गुरुनी आपल्या जवळ असलेले ज्ञान समाजात देऊन जनकल्याण करावे. ज्याप्रमाणे साठवून ठेवलेल्या पाण्याचे रूपांतर डबक्यात होते,तर वाहत्या पाण्याचे रूपांतर ओढा, नाला, ओहोळ, नदी आणि शेवटी सागरात जाऊन मिसळते, तेंव्हा त्या पाण्याचे अथांग स्वरुप बघण्यास मिळते, ज्ञानाचे सुद्धा असेच आहे. जेवढे ज्ञान देत राहू तेवढेच ज्ञान उत्तरोत्तर समृद्ध होत राहते. लोकांच्या श्रद्धा व विश्वास यांना तडा बसेल असे काही गुरुनी करू नये असा संदेश यातून मिळतो.

परिश्रमाशिवाय कोणतीच वस्तू प्राप्त होत नाही. विना मेहनत फळाची अपेक्षा करणे म्हणजे मूर्खपणा, संत रामदास स्वामी यांनी म्हटल्याप्रमाणे "आधी कष्ट मग फळ, कष्टाविना सर्व निष्फळ." कर्म करीत असताना फळाची अजिबात आशा न ठेवता अविरत काम करत राहिल्यास केलेल्या कार्याचे चांगलेच फळ मिळतील. नुसते दहावीच्या वर्षात कठोर अभ्यास केल्याने यश मिळत नाही वा राज्यातून पहिला वा दूसरा नंबर मिळावा अशी आशा ठेऊन अभ्यास केल्यास आणि मिळाला नाही तर निराशा येते, म्हणून कसलीही आशा न ठेवता अविरत मन लावून अभ्यास केले तर त्याचे चांगलेच परिणाम बघायला मिळतात. असे अनेक मौलिक संदेश या गीतेतून मिळतात.त्यास्तव आज गीता जयंतीच्या दिवशी यातील काही मौलिक गोष्टी लक्षात घेऊन तसा वागण्याचा प्रयत्न केल्यास आपले जीवन सुखी, समृध्दी व आनंदी निश्चितच होईल, यात संदेह नाही

17) 14 जानेवारी – मकरसंक्रांत




गोड गोड बोलण्याचा सण

नविन वर्षातील पहिला सण म्हणजे संक्रांत. मकरसंक्रांत म्हणजे सूर्य धनू राशीतून मकर राशीत प्रवेश करतो तो दिवस. सूर्य या दिवशी दक्षिणायनातुन उत्तरायनात मार्गक्रमण करतो. या दिवसापासून सूर्याचे उत्तरायण सुरू होते. पृथ्वी वरुन पाहिले असता, सुर्याच्या उगविण्याची जागा दिवसेंदिवस उत्तरेकडे सरकते. याच दिवसापासून हिवाळा हळूहळू संपू लागतो आणि उन्हाळ्याची सुरूवात होते. याच दिवशी पृथ्वीचा उत्तर गोलार्धात प्रवेश होतो.

इंग्रजी महिन्यानुसार मकरसंक्रांत हा दिवस १४ जानेवारी रोजीच येतो. परंतु दर ७० वर्षांनी ही तारीख एका दिवसानी पुढे सरकते. यावर्षी 15 जानेवारीला हा सण साजरा करण्यात

येत आहे. महाराष्ट्रात हा सण तीन दिवसात साजरी करण्याची पध्दत आहे. संक्रांतीच्या पूर्वी भोगी आणि संक्रांतीनंतर दुसऱ्या दिवशी किंक्रांती म्हणजे कर सण साजरा केला जातो. संक्रांती सणाच्या दिवशी प्रत्येकजण आपल्या नातलग आणि आपल्या जवळच्या व्यक्तीला तिळगुळ देतात आणि 'तिळगुळ घ्या आणि गोड गोड बोला' असे सांगून स्नेह, प्रेमात वाढ होण्याविषयी शुभकामना दिली जाते. थंडीच्या दिवसात उष्ण अशा तीळ आणि गुळाचे सेवन करणे आरोग्याला हितकारक मानले जाते. जीवनामध्ये नेहमीच आपणाला हा संदेश उपयोगात येऊ शकतो. जगात बंधुता निर्माण करायची असेल तर सर्वांशी गोड बोलणे आवश्यक आहे. गोड बोलणे म्हणजे समोरच्या व्यक्तीला आपल्या बोलण्याने त्रास होणार नाही असे बोलणे होय. बहुतांश वेळा मोठ्या भांडणाचे मूळ जर शोधले तर ते बोलण्यावरुन घडल्याचे लक्षात येते. त्यामुळे असे म्हटले जाते की, बोलून विचार करण्यापेक्षा विचार करून बोलणे केव्हाही चांगले. सतत आपले बोलणे चालू ठेवण्यापेक्षा फार कमी बोलल्यास त्याचा फायदा आपणास नक्की होतो. ' उचलली जीभ लावली टाळ्याला ' या म्हणीनुसार जर आपण बोलत असू, तर आपल्या बोलण्याला काहीच किंमत उरणार नाही. त्यास्तव आपले महत्त्व कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे एकही घर शोधून ही सापडणार नाही, ज्यांच्या शेजारी-शेजारी भांडण होत नाही. परंतु आपण आजच्या दिवसाचे तत्व वर्षभर अवलंबिले तर शेजाऱ्यांसोबत नक्कीच भांडणे होणार नाहीत. संकट काळात किंवा अडीअडचणीत आपणाला आधार कोण देतो ? तर तो असतो शेजार. घराला कुलूप लावून जायचे असेल तर आपण कुलुपाची चावी कुठे ठेवणार ? दुपारच्या सुट्टीत घरी येणाऱ्या मुलांची व्यवस्था कोठे होते ? घरी वडील नसते वेळी घरात काही अपघात घडले तर कोणाला बोलवणार ? अर्थातच या सर्व प्रश्नांची उत्तरे शेजाऱ्यांच्या घरी जाऊन थांबतात. म्हणून विशेष करून शेजाऱ्यांपाजाऱ्यांना नेहमीच गोड बोलणे फायद्याचे ठरते. म्हणूनच संतांनी म्हटले आहे शेजाऱ्यावर प्रेम करा.

आपला देश हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे प्रत्येक सणाचा कुठे ना कुठे शेतीशी संबंध येतो. जानेवारीच्या दिवसांमध्ये शेतातून उत्पन्न येण्यास प्रारंभ झालेले असते. शेतातून आलेल्या

धान्याचे वाण स्त्रिया एकमेकांना देतात. विवाहित स्त्रिया या दिवशी हळदी-कुंकू कार्यक्रम करतात. हरभरे, उस, बोरे गव्हाची ओंबी, तीळ अशा गोष्टी सुगडात भरून त्या देवाला अर्पण करतात तसेच सुवासिनीची ओटी ही भरतात. सध्या नवीन युगातील स्त्रिया वाण म्हणून जे काही प्लॉस्टिकच्या वस्तू देत आहेत ते देण्यापूर्वी एक वेळ जरूर विचार करावा.

भारतातल्या विविध प्रदेशात वेगवेगळ्या पद्धती आणि वेगवेगळ्या नावाने हा सण साजरा केला जातो. जसे की उतर भारतातील हिमाचल प्रदेश आणि पंजाब मध्ये लोहरी या नावाने हा सण साजरा केला जातो. पूर्व भारतातील आसाम राज्यात भोगाली बिहू असे म्हटले जाते. पश्चिम भारतातील गुजरात व राजस्थान मध्ये हा सण उत्तरायण म्हणजे पतंग उडविण्याचा सण म्हणून ओळखला जातो. आबालापासून वृध्दापर्यंत सर्वच जण खुप मोठ्या प्रमाणावर पतंग उडवून धमाल करतात. भारताच्या दक्षिण भागातील तामिळनाडू राज्यात हा सण पोंगल या नावाने खुप प्रसिध्द आहे. भारतातल्या  इतरत्र भागात संक्रांती या नावानेच हा सण प्रसिध्द आहे.

मकरसंक्रांती सणाच्या निमित्ताने भारतात अनेक ठिकाणी यात्रा आयोजित केले जातात. प्रामुख्याने प्रत्येक बारा वर्षांनी आयोजित करण्यात येणारी कुंभमेळा यात्रा, ज्याची बरेच जण प्रतिक्षा करतात. याशिवाय कोलकाता शहराजवळ जेथे गंगा नदी बंगालच्या उपसागरास मिळते तेथे गंगासागर यात्रा आयोजित केली जाते. भारतातल्या विविध भागातील आणि प्रदेशातील लोक यादिवशी एकत्र येतात. भारतातील ही सर्वात मोठी यात्रा समजली जाते. केरळ राज्याच्या शबरीमाला ज्याठिकाणी सध्या मंदिरात स्त्री प्रवेश करण्यावरून वाद होत आहे, येथे मकरज्योतीचे दर्शन घेण्यास या दिवशी अनेक भाविकांची गर्दी होते. मकरसंक्रांत हा सण जरी एक असेल परंतु भारतात वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या पध्दतीने सण साजरी करतात. त्याचा एकमेव उद्देश्य म्हणजे एकमेकांना प्रेम देणे आणि घेणे असे आहे. तेंव्हा चला तर मग पुढच्या मकरसंक्रांतीपर्यंत काळजी घेऊ स्वतःची आणि हो शेजाऱ्यांची सुध्दा.

18) पळस आणि होळी

विविध रंगात रंगुनी होळी

होळीची चाहूल म्हणजे आजूबाजूच्या परिसरात फुललेला पळस. पळसाची फुले आपल्या विशिष्ट रंगामुळे सर्वांना आकर्षित करत असतात. मराठी वर्षातील शेवटच्या फाल्गुन महिन्याला सुरुवात झाली की शेतात आणि जंगलात पळसाच्या झाडाला अनेक फुले दिसू लागतात. असे म्हटले जाते की पूर्वीच्या काळातील माणसे ही पळसाची फुले एकत्र करून त्याचा रंग तयार करीत असत आणि होळीच्या दुसऱ्या दिवशी एकमेकांवर हा रंग टाकून धुलीवंदनाचा सण साजरा करीत. परंतु काळ बदलत गेला तसा लोकांच्या सण साजरा करण्याच्या पद्धती देखील बदलत गेल्या. आज या पळसाच्या फुलांकडे लोकांचे फक्त लक्ष जात आहे मात्र त्याचा रंग म्हणून कोणी वापर करत नाहीत. बाजारात उपलब्ध असलेल्या विविध रंगाचा वापर आज केल्या जात आहे, ज्यामुळे अनेकांना त्वचारोग होण्याचा धोका देखील संभवत असतो. काही महाभाग मंडळी वोर्निश कलर ही वापरतात. ज्यामुळे खूप त्रास होतो. मित्रा-मित्रात हा खेळ खेळताना कोण कशाचा वापर करेल हे सांगता येत नाही. एकमेकांवर अंडे फोडण्याचे प्रकार देखील काही ठिकाणी होतात. अंड्याच्या उग्र वासामुळे रंगाचा खेळ बेरंग होऊ शकतो. म्हणून सर्व बाबी लक्षात घेऊन नैसर्गिक रंगाचा वापर करून रंगपंचमीचा सण साजरा केल्यास ते सर्वासाठी सोईस्कर होईल.

सायंकाळच्या कातरवेळी शेतात करूया मुक्त विहार

रखरखत्या वातावरणात पाहू पळस फुलांचा बहार

*झजरी दादा, झजरी दादा*

फाल्गुन महीना सुरु झाला की आमच्या बच्चे कंपनीला खुप आनंद व्हायचा कारण सर्वात आवडणारा आमचा होळीचा सण जवळ आलेला असायचा. होळीच्या पंधरा दिवासपूर्वीच आम्हाला वेध लागायाचे. तीन चार मित्र मिळून एक गट केल्या जायचे. सुताराजवळ जाऊन दोन छान लाकडे तासुन घ्यायचे, ज्यास आज टिपरी म्हणतात हे कळले. ते दोन लाकडे एकमेकावर आपटून प्रत्येकाच्या घरा समोर जाऊन *झजरी दादा, झजरी दादा* हे गीत म्हणून खांद्यावर असलेल्या झोळीमध्ये घरातील माई, ताई, अक्का वाटीभर ज्वारी टाकायचे. हे दिवस म्हणजे प्रत्येकांच्या घरी शेतातून ज्वारी आलेली असायची त्यामुळे ज्वारी देताना कोणी कुरकुर करायचे नाही. जर कोणी दान दिले नाही तर त्यांच्या नावाने बोंबा मारुन पुढे जायचो. असे आम्ही रोज पंधरा दिवसात पूर्ण गाव पिंजुन काढायचो. जवळपास एक-दीड पायली ज्वारी जमा व्हायची. ते सर्व ज्वारी दुकानात विकून मिळालेल्या पैश्यात खोबऱ्याचे व साखरचे हार प्रत्येकाला एक-एक मिळेल असे घ्यायचो आणि उरलेल्या पैश्यात रंग घेत असू. होळीच्या सायंकाळी आम्ही सर्व मित्र मारोतीच्या पाराजवळ जेथे होळी तयार केलेली असायची तेथे जमा व्हायचो. वेगवेगळ्या नावाने मग बोंबा मारायचो. गावातील मानकरी वाजत गाजत येऊन होळी पेटवायचा. आम्ही होळीतील जाळ घरी नेऊन छोटी होळी करायचे आणि त्यात खोबरा व हरभरा भाजून खायचो. मग रात्री जेवताना पूरणपोळी आणि कढीची मजा काही औरच असायची. दुसऱ्या दिवशी सकाळ होण्याची वाटच पाहत असू. सकाळपासून मग मित्रामध्ये रंग खेळण्याची मजा यायची. कोणी कोणास ओळखू येणार नाही एवढा रंग लावले जायचे. दुपारपर्यंत रंग खेळून झाल्यावर स्नान करून मग घरातच बसायचो. आज परत ते सर्व दिवस आठवू लागले. ते मित्र परत दिसू लागले. परत एकदा छोटे व्हावे आणि खुप मजा करावे असे वाटते.

19) धुलिवंदन

होळीच्या दुसऱ्या दिवशी धुलिवंदनाचा सण साजरा केला जातो. याला' धुळवड' असेही म्हणतात. एकमेकांना गुलाल लावून रंगांची उधळण करणे, सर्वांनी एकत्र येणे, बंधूभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून याकडे पहिले जाते. या दिवशी लोक आपसातील भेदभाव, भांडण, गरिबी-श्रीमंती विसरून एकत्र येतात. होळीचे मानसिकदृष्ट्या देखील महत्त्व आहे. लोकांच्या मनात बऱ्याच प्रकारचे मनोविकार लपलेले असतात. ते समाजात भीतीने किंवा शालीनतेमुळे प्रकट होऊ शकत नाहीत. होळीच्या दुसऱ्या दिवशी ते सगळे बाहेर काढण्याची संधी असते. होळीच्या दिवशी शिव्या देणे हा सुद्धा त्याचाच एक भाग आहे. मनातील राग, द्वेष इत्यादी भावनाना मोकळी वाट करून देण्यासाठी हा सण अत्याधिक महत्वाचा आहे. एकीकडे मुले रंगात न्हाऊन निघतात तर याच दिवशी कुमारिका मुली प्रत्येकाच्या घरी जाऊन ओवाळणी करतात आणि त्यांच्याकडून भेट म्हणून धान्य किंवा पैसे घेतात. घरात काम करणारे जे काही कामगार मंडळी असतात ते देखील खुशाली मागतात आणि घरधनी त्यांना खुशाली देऊन खुश करतात. शहरापेक्षा ग्रामीण भागात हा सण मोठ्या आनंदात साजरा केला जातो.

दरवेळी सण येतात नि जातात

एकमेकांत प्रेम निर्माण करतात

सणाचे महत्व समजून घेतले तर

प्रत्येक सण सदा आनंदच देतात.

आपली आठवण अशीच येत राहो, मित्रांनो आपणा सर्वाना होळी आणि धूलिवंदनच्या रंगबिरंगी शुभेच्छा.

नागोराव सा. येवतीकर

स्तंभलेखक तथा विषय शिक्षक

जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा धर्माबाद

ता. धर्माबाद जि. नांदेड

9423625769

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं.**

**नासा येवतीकर यांचं हे सहावं पुस्तक.**

नासा येवतीकर हे नांदेडच्या ग्रामीण भगातील शिक्षक. विद्यार्थ्यांप्रती शिकवण्याची व विकासाची प्रचंड तळमळ, देशाबद्दल अतोनात प्रेम आणि उपजत प्रतिभा यांचे फ़ळ म्हणजे त्यांचे लेखन. ते समाज बदलण्याच्या हिरीरीने लेहीतात. एक जोमदार ऊर्जा त्यांच्या लेखनात असते. पण अशा लेखकांना योग्य प्रकाशक मिळणं कठीण जातं. एकतर ग्रामीण महाराष्ट्रात प्रकाशक कमीच. त्यात लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं विकली जात नाहीत. त्यामुळे प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी "मृत्युंजय"कार शिवाजी सावंतांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता. अशा तरूण लेखकांना बळ देण्यासाठी आपण सर्व वाचक आणि ई साहित्यची संपूर्ण टीम आता कटीबद्ध आहोत. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड. पण त्यांना योग्य प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्रीबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे?

या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत.

नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. वाचकांनी त्यांना मनात स्थान द्यावे. त्यांच्या सादेला प्रतिसाद द्यावी.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात.

शुभम पाटील, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे, प्रीती सावंत दळवी असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे, आत्मविश्वासाने भारलेले तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

### बस्स. अजून काय पाहिजे?